## केजरीवालांना ‘सुप्रीम’ धक्का

**नवी दिल्ली ।** कथित मद्य घोटाळा प्रकरणात अटक करण्यात आलेले दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना आज सुप्रीम कोर्टाने मोठा धक्का दिला आहे. कोर्टाने त्यांच्या अंतरिम जामिनाला मुदतवाढ देण्याची मागणी करणाऱ्या याचिकेवर तातडीने सुनावणी करण्यास नकार दिला. अरविंद केजरीवाल यांना अंतरिम जामिनावर तुरुंगातून बाहेर सोडण्यात आले असून त्याची अंतिम मुदत १ जून पर्यंत आहे. परंतु अरविंद केजरीवाल यांचे वकील अभिषेक मनू सिंघवी यांनी अंतरिम जामीन ७ दिवसांनी वाढवावा, अशी मागणी केली आहे.


शिल्पकार विकासाचा...

# देशदूत

इंटरनेट आवृत्ती www.deshdoot.com | नंदुरबार | वर्ष २६ । अंक २६५ । बुधवार, दि. २९ मे २०२४ । पाने ८ | किंमत ₹ ५ | मोबाईल आवृत्ती वाचा व वर


## आतिशी यांना बजावले समन्स

**नवी दिल्ली ।** आम आदमी पक्षाच्या नेत्या आणि दिल्लीच्या शिक्षण मंत्री आतिशी यांच्याविरुद्ध राउज एव्हेन्यू कोर्टाने मंगळवारी समन्स जारी केले आहे. मानहानीच्या प्रकरणात आतिशी यांच्याविरोधात हे समन्स जारी करण्यात आले आहे. कोर्टाने आतिशी यांना २९ जून रोजी हजर राहण्याचे समन्स बजावले आहे. याचबरोबर, दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल हे देखील या प्रकरणात आरोपी आहेत. दिल्लीतील भाजपा नेते प्रवीण शंकर कपूर यांनी मानहानीची तक्रार दाखल केली होती.

## संपादकीय

### अनाठायी धाडस नकोच

दिवस पर्यटनाचे आहेत. लोक त्यांच्यापरीने फिरायला जातात. सहलीचे ठिकाण आणि त्याचे अंदाजपत्रक त्यांच्या दृष्टीने कदाचित फारसे महत्वाचे नसावे. रोजच्या धामधुमीतुन थोडासा वेळ काढून चार क्षण निवांतपणे जगणे हाच अनेकांचा सहलीमागचा एक उद्देश असू शकतो. पण सहलींच्या ठिकाणी दाखवले जाणारे अनाठायी धाडस अती उत्साही पर्यटकांसाठी जीवघेणे ठरते. नुकत्याच अशा दोन घटना घडल्या. नाशिकरोडचे पाच जण इगतपुरी तालुक्यातील भावली धरणावर फिरायला गेले होते. काही जण धरणाच्या पाण्यात पोहायला उतरले. खोलीचा अंदाज न आल्याने बुडायला लागले. त्यांना वाचवण्यासाठी उरलेल्या व्यक्तींनी पाण्यात उड्या घेतल्या. दुर्दैवाने पाचही जणांचा मृत्यू झाला. दुसरी घटना मंचरजवळील निरगुडसर येथे घडली. मुले दुपारच्या वेळी शेततळे पाहायला गेली. न राहवून मुले तळ्याच्या पाण्यात उतरली. त्यात दुर्दैवाने चार मुलांना त्यांचे प्राण गमवावे लागले. अशा घटना अधूनमधून घडतात. आगामी दिवस हंगामी पावसाचे आहेत. लोकांना पावसाळी पर्यटनाचेही वेध लागतील. धबधबे आणि समुद्रकिनारे त्यांना खुणावतील. तथापि लोकांनी सुरक्षित पर्यटनाला प्राधान्य द्यायला हवे. पर्यटनाची सगळीच ठिकाणे लोकांना सवयीची नसतात. त्यामुळे तेथील वातावरणाचा, निसर्गाचा आणि त्या ठिकाणच्या भौगोलिक परिस्थितीचा अंदाज लोकांना नसणे स्वाभाविकच. अशा ठिकाणी गेल्यावर तेथील उपरोक्त गोष्टींचा आदर राखणे, निसर्गाचे सानिध्य अनुभवणे आणि अती उत्साह न दाखवता सहलीची मजा घेणे अपेक्षित असते. पण अनेकदा नेमके त्यांच्या उलट घडताना आढळते. अनेक माणसे भान विसरून जातात. विशेषतः धबधबे आणि समुद्रकिनाऱ्यांवर त्यांच्या उत्साहाला समुद्राइतकेच उधाण येते. काय करू आणि काय नाही अशीच काहींची अवस्था असते. पट्टीचे पोहोणारे देखील अशा ठिकाणी धाडस करताना फारसे आढळत नाहीत. पण अनेक सामान्य पर्यटक मात्र तेथील पान २ वर

# आता मी गाली प्रूफ झालोय!

## पंतप्रधान नरेंद्र मोदींचा विरोधकांवर हल्लाबोल



**नवी दिल्ली ।** विरोधकांनी शिव्या दिल्याने मला काहीच फरक पडत नाही. या लोकांना वाटत की, केवळ त्यांनाच शिव्या देण्याचा अधिकार आहे. मात्र मी आता त्यांच्याकडे दुर्लक्ष करतो.कारण त्यांच्या शिव्या खाून मी आता गाली प्रुफ झालो आहे. असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एका मुलाखतीत केले आहे. यावेळी त्यांनी काँग्रेस, आम आदमी पार्टी आणि तृणमूल काँग्रेसवर हल्लाबोल केला. मोदी म्हणाले, इंडिया आघाडीवाल्या लोकांनी जिथे त्यांची सत्ता आली तिथे रातोरात दरोडा टाकून ओबीसींचे आरक्षण हिरावले. या लोकांनी मुस्लिम समाजातील विविध जातींचा ओबीसीत समावेश केला आणि ओबीसींचे आरक्षण त्यांना लागू केले. त्यांनी दरोडा टाकून ओबीसींचे अधिकार हिसकावले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले, या लोकांनी ओबीसींचे आरक्षण हिरावले आहे, याविरोधात आम्ही निवडणूक काळात आवाज उठवला. कर्नाटकमध्ये त्यांनी जे काही केलंय, पश्चिम बंगालमध्ये त्यांनी ज्या प्रकारे ओबीसींच्या आरक्षणावर घाला घातला, त्याविरोधात आम्ही आवाज उठवला. दरम्यान, यावर कोलकाता उच्च न्यायालयाचा निकाल आला तेव्हा स्पष्ट झाले की, या लोकांनी दगाबाजी केली होती. केवळ व्होट बँकेचे राजकारण करण्यासाठी त्यांनी ओबीसींचे अधिकार हिरावले. याप्रकरणी न्यायालयाच्या निकालानंतर हे लोक न्यायपालिकेला शिव्या देऊ लागले. काहीही झाले तरी आम्ही न्यायालयाचा आदेश मानणार नाही, अशी भूमिका घेतली. मात्र आम्ही या असल्या गोष्टी सहन करणार नाही.

दरम्यान, मोदी यांना यावेळी विचारण्यात आले की, यंदाच्या लोकसभा निवडणुकीत विरोधक आणि सत्ताधारी पक्षांमधील नेत्यांनी एकमेकांवर वैयक्तिक पातळीवर टीका केली. त्याबद्दल काय सांगाल? यावर उत्तर देताना मोदी म्हणाले, तुम्ही जर माझ्याबद्दल बोलत असाल तर मी इतकंच सांगेन की, मी गेल्या २४ वर्षांपासून शिव्या खाऊन, खाऊन गाली प्रूफ झालोय. काही जण मला मौत का सौदागर म्हणायचे, गंदी नाली का किडा म्हणायचे. एकदा संसदेत मला इतक्या शिव्या दिल्या गेल्या की, माझे एक मित्र शिव्या मोजत होते. तेव्हा मला १०१ शिव्या दिल्या होत्या. निवडणूक असो अथवा नसो, या लोकांना असे वाटते की, शिव्या देण्याचा अधिकार केवळ त्यांनाच आहे. ते लोक इतके हताश आणि निराश झालेत की शिव्या देणे, अपशब्द वापरणे हा त्यांच्या स्वभावाचा भाग झाला आहे

### त्यांनी संविधान वाचावे!

दरम्यान, दिल्ली सरकारच्या कथित मद्य धोरण घोटाळ्याप्रकरणी तिहार तुरुंगात असलेले दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल हे जामिनावर बाहेर आले असून त्यांनी पत्रकार परिषद घेऊन थेट पंतप्रधान मोदींवर हल्लाबोल केला. ते म्हणाले, मोदींनी मला आणि झारखंडचे माजी मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांना तुरुंगात डांबलं. या कारवाया मोदींच्या इशाऱ्यानेच होतात. केजरीवालांच्या या आरोपांवर मोदी यांनी उत्तर दिले. मोदी म्हणाले, या लोकांनी माझ्यावर टीका आणि आरोप करण्यापेक्षा संविधान वाचावे, देशातील कायदे वाचावे.



स्वामी विवेकानंद मेमोरियलमध्ये ध्यानधारणा

## प्रचार संपताच नरेंद्र मोदी पोहोचणार कन्याकुमारीत!

**नवी दिल्ली ।** लोकसभा निवडणुकीच्या सातव्या टप्प्यासाठी १ जून रोजी मतदान होणार आहे. तत्पूर्वी ३० मे रोजी मतदानपूर्व आचारसंहिता घोषित होईल. आचारसंहितेची घोषणा होताच पंतप्रधान मोदी ३० मे ते १ जूनपर्यंत कन्याकुमारीला भेट देऊन ध्यानधारणा करणार आहेत. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, कन्याकुमारीच्या समुद्रकिनारी असलेल्या विवेकानंद रॉक मेमोरियलला भेट देऊन पंतप्रधान नरेंद्र मोदी याठिकाणी दोन दिवस ध्यानधारणा करणार आहेत. याच ठिकाणी स्वामी विवेकानंद यांनीही ध्यानधारणा केली होती.

**पंतप्रधान मोदींचा कार्यक्रम**

लोकसभेच्या सातव्या टप्प्यासाठी १ जून रोजी ५७ लोकसभा मतदारसंघात मतदान होत आहे. ३० मे रोजी सायंकाळी ५ वाजता प्रचाराच्या तोफा थंडावणार आहेत. ३० मे रोजीच पंतप्रधान मोदींची पंजाबमध्ये जाहीर सभा होत आहे. ही सभा झाल्यानंतर ते तमिळनाडूच्या दौऱ्यावर रवाना होतील. तिथून ते ३१ मे रोजी विवेकानंद रॉक मेमोरियलला भेट देऊन दोन दिवस ध्यानधारणा करतील, असे सांगितले जात आहे. या दौऱ्याचा अद्याप अधिकृत कार्यक्रम जाहीर करण्यात आलेला नाही.

### कन्याकुमारीची निवड का?

कन्याकुमारीच्या रॉक मेमोरियल येथे ध्यान केल्यानंतर स्वामी विवेकानंद यांनी भारतासाठीचे आपले विचार व्यक्त केले होते. या जागेचा स्वामी विवेकानंद यांच्यावर फार प्रभाव पडला होता. ज्याप्रकारे सारनाथी भूमी गौतम बुद्धांच्या जीवनातील महत्त्वाचा दुवा मानली जाते, त्याचप्रकारे कन्याकुमारीतील टेकड्यांचे विवेकानंद यांच्या आयुष्यात अनन्यसाधारण महत्त्व असल्याचे सांगितले जाते. देशभरात प्रवास केल्यानंतर स्वामी विवेकानंद याठिकाणी आले होते, त्यांनी तीन दिवस याठिकाणी ध्यान केले होते.

### २०१९ मध्ये होते केदारनाथला

२०१९ सालीही निवडणुकीचा प्रचार संपल्यानंतर पंतप्रधान मोदींनी ध्यानधारणा केली होती. लोकसभेच्या शेवटच्या टप्प्याचा प्रचार संपल्यानंतर पंतप्रधान मोदी उत्तराखंडमधील केदारनाथ येथे गेले होते. तेथील रुद्र गुहेत त्यांनी ध्यानधारणा केली होती. यावेळी ते कन्याकुमारी येथे जात आहेत.

## अग्रवाल बाप-बेट्यांना न्यायालयीन कोठडी

**पुणे ।** पुण्यातील हीट अँड रन प्रकरणात चालकाला डांबून ठेवल्याच्या गुन्हय़ात अल्पवयीन आरोपी मुलाचे वडील विशाल आगरवाल व आजोबा सुरेंद्रकुमार आगरवाल यांना न्यायालयाने ३१ मेपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. पोर्शे कारखाली दोघांना चिरडणाऱ्या अल्पवयीन आरोपीला वाचवण्यासाठी अग्रवाल कुटुंबाकडून विविध मार्गांचा अवलंब केला गेला होतो. याप्रकरणी गंगाधर शिवराज हेरीप्रुब या चालकाने आरोपींविरोधात तक्रार दिली आहे.

## पाच हजारांची लाच भोवली : विटनेरचा तलाठी गजाआड

**चोपडा ।** अवैधरीत्या वाळूची वाहतूक करून देण्यासाठी तक्रारदारांकडून दहा हजार रुपयांच्या लाचेची मागणी करणाऱ्या विटनेर (ता. चोपडा) येथील तलाठ्याला पाच हजार रुपयांची लाच स्विकारतांना जळगाव येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने रंगेहाथ पकडून अटक केल्याची घटना मंगळवारी सकाळी विटनेर येथे घडली.लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या कारवाईमुळे महसूल प्रशासनातील कर्मचाऱ्यांमध्ये खडबळ उडाली आहे.

चोपडा तालुक्यातील विटनेर येथील तक्रारदार यांच्या सासऱ्याच्या नावाने पंतप्रधान आवास योजना अंतर्गत घरकुल मंजूर असून,सदर बांधकामासाठी वाळूची आवशक्यता



असल्याने विटनेर येथील तलाठी रवींद्र काशिनाथ पाटील यांनी संबधित तक्रारदार यांचेकडे ट्रॅक्टरने अवैध वाळू वाहतूक करण्यासाठी १०,००० रुपयांच्या लाचेची मागणी केली.शेवटी तडजोडी अंती ५,००० रुपये देण्याचे ठरले.त्यानंतर विटनेर येथील तक्रारदार यांनी दि.२७ मे रोजी सोमवारी जळगाव येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार केली त्याप्रमाणे पथकाच्या पडताळणीत पंचा समक्ष पाच हजार लाचेच्या मागणीची खातरजमा केल्या नंतर सापळा लावण्यात आला. दरम्यान आज दि.२८ मे रोजी मंगळवारी दुपारी विटनेर येथील तलाठी रवींद्र काशिनाथ पाटील यांना तक्रारदाराकडून ५,०००/- रुपयांची लाच स्विकारतांना विटनेर येथे जळगाव येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने रंगेहाथ पकडून अटक केल्याची कारवाई केली.या प्रकरणी संशयित तलाठी रवींद्र काशिनाथ पाटील यांचे विरुद्ध ग्रामीण पोलीस स्टेशनला लाचलुचपत प्रतिबंधक कायद्याखाली गुन्हा दाखल करण्यात आला असून,त्यांना अटक करण्यात आली आहे.

पोलीस निरीक्षक एन.एन. जाधव, एएसआय दिनेशसिंग पाटील, हवालदार सुरेश पाटील, रवींद्र घुगे, महिला हवालदार शैला धनगर, किशोर महाजन,सुनील वानखेडे, प्रदीप पोळ, राकेश दुसाने, अमोल सूर्यवंशी,सचिन चाटे आदींच्या पथकाने कारवाई केली.

## गाढवाला कितीही चंदन लावा ते अंगाला राखच लावणार!


### देवेंद्र फडणवीसांचा उध्दव ठाकरेंवर निशाणा



**पुणे ।** गाढवाला कितीही चंदन लावले तरी ते उकिरड्यावर जाऊन अंगाला राख लावणारच, संत तुकाराम महाराजांनी त्यांच्या ओवीत हेच सांगितलेले आहे. सध्याच्या राजकीय धुराळ्यात कोण आपल्या अंगाला राख लावून घेतंय हे सर्वांनाच माहिती आहे, मी कोणाबद्दल बोलतोय याची तुम्हाला कल्पना आहेच असं म्हणत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी उद्धव ठाकरेंवर त्यांचे नाव न घेता टीका केली.

पिंपरी चिंडवडमधील विकास कामांच्या उद्घाटनाच्या प्रसंगी बोलताना त्यांनी ही टीका केली. देवेंद्र फडणवीस म्हणाले की, तुकाराम महाराजांच्या नावाने पिंपरीमध्ये नाट्यगृह होत आहे ही त्यांना दिलेली सांस्कृतिक वंदना आहे. अलिकडच्या काळात नाट्यगृहाच्या बाहेरच जास्त नाटकं होतात. मानापमानाच्या गोष्टी होतात, मनातील कथाकथन रचले जातात, खोटे नाटे आरोप होत आहेत. त्यामुळे संशयकल्लोळ सुरू आहे. पण जनता सुज्ञ आहे. नटसम्राटासारखे वागले म्हणजे नटसम्राट होता येत नाही हे काही लोकांना सांगायचं आहे. तसं केलं तर कट्यार काळजात घुसणार हे नक्की. शेवटी आमच्या एकनाथ शिंदेंनी डंपर पलटी केलाच आहे.

पिंपरी चिंचवडचे आमदार महेश लांडगे यांच्या पुढाकारातून शहरामध्ये विविध विकासकामांचे उद्घाटन करण्यात आलं. त्यावेळी देवेंद्र फडणवीसांनी राज्यातल्या शहरांच्या विकासाची दिशा कशी आहे याची माहिती दिली. शहरांच्या विकासामध्ये पर्यावरणाचा ऱ्हास कसा रोखता येईल, प्रदूषण कसे कमी करता येईल याची माहिती त्यांनी दिली.



**शिमला : हिमाचल प्रदेशमध्ये काँग्रेस उमेदवाराच्या प्रचारसभेत पोहोचलेल्या प्रियांका गांधींचा सत्कार करताना उमेदवार. सोबत हिमाचल प्रदेशचे मुख्यमंत्री सुखविंदरसिंग सुक्कु.**

### केळी भाव

| | |
|---|---|
| नवती (१) | : 1310 |
| नवती (२) | : 1160 |
| पिलबाग | : --- |
| वापसी | : --- |

### मिश्कीली




## धुळ्यात दिवसा अवजड वाहनांना प्रवेशबंदी

**धुळे ।** देवपूरातील भिषण अपघाताची प्रशासनाने गंभीर दखल घेतली असून शहरातील वाहतूक कोंडी व अपघात टाळण्यासह माल वाहतुक व्यवस्था सुरळीत रहावी, यासाठी पोलिस अधिक्षक श्रीकांत धिवरे यांनी अवजड वाहनांच्या रहदारीच्या नियमनात अंशत: बदल केला आहे. त्यानुसार सकाळी ६ ते रात्री ९ वाजेपर्यंत शहरात अवजड वाहनांना प्रवेशबंदी करण्यात आली. आजपासूनच हे आदेश अंमलात आले आहे.

इंदूरकडुन येणारे सर्व अवजड वाहनांना नगांवबारी चौक, देवपुर पासून धुळे शहरात सकाळी ६ ते रात्री ९ वाजेपर्यंत प्रवेशबंदी राहील. साक्रीरोड सुरतकडुन येणारे अवजड वाहनांना कृष्णाई हॉटेल साक्री बायपास पासुन धुळे शहरात सकाळी ६ ते रात्री ९ पर्यंत प्रवेशबंदी राहील. मुंबईकडुन धुळे शहरात गुरुद्वाराकडुन येणारे अवजड वाहनांना नवीन डीमार्टपर्यंत प्रवेश राहील. त्यापुढे सकाळी ६ ते रात्री ९ वाजेपर्यंत प्रवेशबंदी पान २ वर

# हाय गर्मी, हुय्य गर्मी; परेशान कर दिया रे!

## राहुल गांधींनी सभेतच डोक्यावर ओतली पाण्याची बॉटल

**चंदिगड ।** भर उन्हाळ्यात सुरू असलेल्या लोकसभा निवडणुकीमुळे अनेक नेत्यांच्या तोंडचे पाणी पळालंय. महाराष्ट्रात एसीमध्ये बसून मोठमोठ्या गप्पा मारणारे नेते उन्हा तान्हात गल्लोगल्ली फिरताना दिसले. अशातच आता लोकसभा निवडणुकीच्या अखेरच्या टप्प्यातील मतदान बाकी असताना देशपातळीवर राजकारण तापू लागलंय. काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी बांसगावच्या रुद्रपूरमध्ये सभा घेतली. त्यावेळी त्यांनी भाषण सुरू असताना पाण्याने भरलेली बाटली डोक्यावर ओतली.त्यामुळे त्यांना देखील उन्हाचा तडाखा बसल्याचे स्पष्ट झाले आहे.

उन्हापासून वाचण्यासाठी लोक वेगवेगळ्या पद्धतींचा अवलंब करत आहेत. अशातच काँग्रेस नेते राहुल गांधी हे देखील एका सभेत उष्णतेपासून वाचण्याचा प्रयत्न करताना दिसले.



भाषण सुरू असताना राहुल गांधी यांना कडक उन्हाचा सामना करावा लागला. तेव्हा त्यांनी पाण्याची बॉटल थेट डोक्यावर ओतली. खुपच ऊन आहे, असे राहुल गांधी यांनी म्हणाले. त्यावर सभेसाठी आलेल्या लोकांनी टाळ्या वाजवत त्यांच्या या कृतीचे स्वागत केले.

दरम्यान, विचित्र आहे पान २ वर

### मोदींवर केली टीका

भारतीय जनता पक्षाने तुम्हा सर्वांना बेरोजगार केले आहे. इंडिया अलायन्सची सत्ता आल्यानंतर तुम्हा सर्वांना ३० लाख सरकारी नोकऱ्या दिल्या जातील, असं आश्वासन राहुल गांधी यांनी दिलंय. एवढ्या उन्हात निवडणुका घेऊन भाजपने आम्हाला आणि तुम्हाला अडचणीत आणले आहे. उन्हाळ्यात निवडणुका घेतल्या असतानाही भाजपला दारुण पराभवाला सामोरं जावं लागणार आहे, असेही ते म्हणाले.

## दहशतवाद विरोधी पथकाची कारवाई

### पुण्यात पाच बांगलादेशींना अटक

**पुणे ।** पिंपरी चिंचवड दहशतवादी विरोधी पथकाने बनावट कागद पत्रांसह ५ बांगलादेशी नागरिकांना अटक केली आहे. दहशतवादी विरोधी पथकाने बनावट कागदपत्रांसह भारतात बेकायदेशीररित्या राहणाऱ्या ५ जणांना अटक केली आहे. ही कारवाई भोसरी भागातील शांतीनगर परिसरात करण्यात आली आहे. या प्रकरणी पोलिसांनी शमीम नुरोल राणा, राज उर्फ सम्राट सदन अधिकारी, जलील नरू शेख उर्फ जलील नूर मोहम्मद गोलदार ,वसीम अजीज उलहक मंडल उर्फ वसीम अजीऊल हक हिरा, आझाद शमशुल शेख उर्फ अबुल कलाम शमशुद्दिन फकीर या पाच बांगलादेशी नागरिकांना अटक केली आहे. त्यांना बनावट कागदपत्रे बनवून देणाऱ्या इतर दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी हे बांगलादेशी नागरिक असून त्यांच्याकडे कोणताही परवाना किंवा वैध कागदपत्र नाही.

## झेड-टेक (इंडिया) लिमिटेडचा आयपीओ आज खुला होणार

■ मुंबई । प्रतिनिधी –

झेड–टेक (इंडिया) लिमिटेड या कंपनीने २९ मे २०२४ रोजी आपला इनिशियल पब्लिक ऑफरिंग (आयपीओ) बाजारात आणण्याची योजना जाहीर केली आहे. या आयपीओद्वारे वरच्या बँडमध्ये ३७.३० कोटी रु. जमा करण्याचे कंपनीचे लक्ष्य आहे. या इश्यूचा साइज ३३,९१,२०० इक्विटी शेअर्स असून प्रत्येक शेअरचे दर्शनी मूल्य १० रुपये आहे.

पान १ वरुन ...

## अनाठायी धाडस नकोच

सूचना फलकांची देखील पत्रास ठेवत नाहीत. परिणामी पाण्यात उतरणे, पोहोणे, आरडाओरड करणे, मोठ्या आवाजात गाणी लावून अंगविक्षेप करून नाचणे हेच अनेक ठिकाणचे सामान्य दृश्य बनत आहे. जीव लाखमोलाचा असतो. त्याचे मूल्य माणसानेच जपायला हवे. रोजच्या वेळापत्रकाला विराम देण्यासाठी माणसे सहलीला जातात. रोजचे आयुष्य विलक्षण धावपळीचे झाले आहे. त्याची गती किमान काही दिवस तरी कमी व्हावी हा त्यामागचा उद्देश असतो. तथापि अनाठायी धाडस चार निवांत क्षणांऐवजी कायमचे दुःख पदरात बांधू शकते याचेच भान लोकांनी ठेवण्याची गरज आहे. त्यांनी ते तसे ठेवले तर त्यांची मुलेही ते ठेवायला शिकू शकतील.

## धुळ्यात दिवसा अवजड वाहनांना प्रवेशबंदी

राहील. चाळीसगाव क्रॉस, शंभर फुटी कॉर्नर पासुन अवजड वाहनांना धुळे शहरात सकाळी ६ ते रात्री ९ वाजेपर्यंत प्रवेशबंदी राहील. तसेच पारोळा चौफुली, कृषि महाविद्यालयपासुन अवजड वाहनांना धुळे शहरात सकाळी ६ ते रात्री ९ वाजपर्यंत प्रवेशबंदी राहील. याबरोबरच बिलाडी रोड, जुने धुळ्यापासुन, वरखेडी रोडपासुन, वडजाई रोडपासुन, चितोड रोड पासुन, गोंदुर रोड पासुन धुळे शहरात व नकाणे रोडपासुन धुळे शहरात येणारे अवजड वाहनांना सकाळी ६ ते रात्री ९ वाजेपर्यंत प्रवेशबंदी राहील.

हा आदेश शासकीय वाहनांना तसेच राज्य परीवहन महामंडळाचे बसेस, स्कूल बस यांना लागु होणार नाही. शहरात किराणा/भुसार/इतर जिवनावश्यक वस्तु यांना दुपारी १२ ते ४ वाजेदरम्यान आदेशातुन सुट देण्यात येत आहे. बंदीच्या वेळे व्यतिरिक्त अवजड वाहनांची वाहतुक नेहमी प्रमाणे राहील. नागरीकांनी बदल केलेल्या वाहतुक नियोजनास सहकार्य करावे, असे आवाहन पोलिस अधिक्षक श्रीकांत धिवरे यांनी केले आहे.

## हाय गर्मी, हुय्य गर्मी; परेशान कर दिया रे!

की जर मोदीजींना खरोखरच देवानं पाठवलं असतं तर त्यांनी भारतातील दुर्बल लोकांना मदत करण्याचं सांगितलं असतं. शेतकरी आणि मजुरांना मदत करा. गरिबांना मदत करा. पण अदानीला मदत करा, भारतातील सर्व विमानतळ अदानीला द्या. भारतातील सर्व वीज प्रकल्प अदानीला द्या. रेल्वे अदानीकडे द्या. अदानी–अंबानींचे १६ लाख कोटींचे कर्ज माफ करा, हा नरेंद्र मोदींचा देव आहे का? असा सवाल राहुल गांधी यांनी यावेळी विचारला आहे.

## निधन वार्ता

### रमेशजी राठी


■ धुळे । प्रतिनिधी



सीए, माहेश्वरी समाजाचे व महेश को ऑपरेटिव्ह पतपेढीचे माजी अध्यक्ष रमेश राठी यांचे श्री बद्रीनाथ धामच्या दर्शनासाठी गेलेल्या असतांना श्री बद्रीनाथ येथे हृदयविकाराच्या धक्क्याने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, मुलगी, जावई नातू असा परिवार आहे.

### ताराचंद गर्दे

■ धुळे । प्रतिनिधी



अंबोडे (ता. धुळे) येथील प्रगतशील शेतकरी व ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच ताराचंद नारायण गर्दे (वय ९५) यांचे २५ मे रोजी निधन झाले. ते कमलाकर गर्दे यांचे वडिल आणि धुळे जिल्हा मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष मनोज गर्दे व सुरेश गर्दे यांचे काका तर किशोर गर्दे, दिनेश गर्दे यांचे ते बाबा होत. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, चार मुली, सुना, पुतणे, नातवंडे असा परिवार आहे.

## नशिबाची परीक्षा

बुधवार २९/०५/२०२४

**✻ मिलन डे ✻**

१४० १५९ ११३ — ५-८ — १२५ १७० ११६ | सिंगल ५-४-७

जोड ५१-९८-०४-७६-८२

**✻ कल्याण बाजार ✻**

१६९ २६८ ६०० — ६-० — ११० २८० २४४ | सिंगल ६-३-७

जोड ६१-२०-४३-७८-०५

**✻ मुंबई (मेन) बाजार ✻**

१२६ ४६९ ९०० — ९-७ — १२४ २७८ ७०० | सिंगल ९-२-०

जोड ९१-४७-३२-०८-७६

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष शास्त्रावर आधारीत आहे. कोणीही दुरुपयोग करु नये मो.९९७५४७९८२६

# वाघेश्वरी मंदिराची दानपेटी फोडली

■ नंदुरबार । प्रतिनिधी





मंदिराच्या खालील बाजूस पोलिसांचे वॉकीटॉकी टॉवर सेंटर असतांना वाघेश्वरी माता मंदिराची दानपेटी चोरट्यांनी फोडल्याने खळबळ उडाली आहे. दरम्यान, सीसीटीव्ही कॅमेऱ्यात दोन्ही चोरटे कैद झाले आहेत. याप्रकरणी नंदुरबार शहर पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली आहे.

येथील वाघेश्वरी मातेच्या मंदिरात मंगळवारी मध्यरात्रीच्या सुमारास दोघा अज्ञात चोरट्यांनी मंदिरातील कडीकोयंडा तोडून आत प्रवेश करीत दानपेटी फोडली. पहाटे नंदुरबार शहर पोलीस ठाण्याच्या गुड मॉर्निंग पथकाच्या कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास ही घटना लक्षात आल्यानंतर त्यांनी तात्काळ वरिष्ठांना कळविले. चोरट्यांनी दानपेटीतील किरकोळ रक्कम व मातेच्या मूर्तीची नाकातली बेन्टेक्सची नथ चोरट्यांनी लांबवली. याप्रकरणी नंदुरबार शहर पोलीस ठाण्यात मंदिराचे सेवेकरी मयूर राजेंद्र मराठे यांनी फिर्यादी दिल्यानुसार घटनेची नोंद करण्यात आली आहे.

सीसीटीव्ही कॅमेरे वाकविले

चोरट्यांनी मंदिरात प्रवेश केल्यानंतर ३ सीसीटीव्ही कॅमेरे वाकवले. मंदिरात एकूण ६ सीसीटीव्ही कॅमेरे आहेत. पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेज हस्तगत केली असून, शोध घेतला जात आहे.

पाईपची केली तोडफोड

चोरट्यांनी मंदिराच्या मागील बाजूस असलेल्या दगडांवर चढून मंदिरात प्रवेश केला. चोरटे साधारणतः १८ ते २२ वर्ष वयोगटातील आहेत. त्यांनी प्रथम मातेच्या मंदिरात पाणीपुरवठा करणाऱ्या प्लास्टिकच्या पाईपांची तोडफोड केली त्यानंतर तोडफोड केलेल्या पाईपांनी सीसीटीव्ही कॅमेरे वाकविले.

चोरी झालीच कशी?

वाघेश्वरी मातेच्या मंदिराच्या खालील बाजूस पोलिसांचे वॉकीटॉकी टॉवर सेंटर आहे. या सेंटरमध्ये २४ तास कर्मचारी नियुक्त असतो असे असतांना मंदिरात चोरी झालीच कशी असा प्रश्न भाविकांमधून उपस्थित करण्यात येत आहे.



# लाकडाची अवैध वाहतूक रोखली

■ बोराडी । वार्ताहर

वाघाडी ते अर्थे रस्त्यावर विना परवाना निम प्रजातीचे लाकुड अवैध वाहतूक करतांना वन विभागाने वाहन पकडले. व वाहनासह माल असा १८०००० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. वाहन रेंज कार्यालय शिरपूर येथे जमा केले.

मिळालेल्या गुप्त माहितीवरून वनसंरक्षक निनु सोमराज, उपवनसंरक्षक नितीनकुमार सिंग, विभागीय वन अधिकारी राजेंद्र सदगीर, यांच्या मार्गदर्शनाखाली वनक्षेत्र शिरपूर प्रादेशिक ,परिमंडळ वाडी नियतक्षेत्र वाडी बिटातील वाघाडी ते अर्थे रस्त्यावर विना परवाना निम प्रजातीचे लाकुड अवैध वाहतूक करताना वाहन पकडले. सदरची कार्यवाही भारतीय वन अधिनियम १९२७ कलम २६ (१ ) ४१, ४२ ,५२(१) व महाराष्ट्र वन नियमावली २०१४ अन्वये करण्यात आली.

शिरपूर इंदूर हायवे लगत रस्त्यावर किरण फर्निचर येथे विना परवाना १२ इंच रंदा मशीन, कटर मशीन सागवान जुने मालापासून तयार केलेले दरवाजे, चौकटी व इतर कट साईझ सागवान मुद्देमाल १.३६० घ.मी मिळून आला. १२ इंच रंदा मशीन व सागवान, ४०००० रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.सदर कार्यवाही भारतीय वन अधिनियम १९२७,४२ व महाराष्ट्र वन नियमावली २०१४ कलम ५३ (१०) अन्वये करण्यात आली.

# विजेचा शॉक लागून पडल्याने कंत्राटी कामगाराचा मृत्यू

■ वरणगाव, ता.भुसावळ । वार्ताहर

वरणगाव फॅक्टरी येथे विजेच्या पोलवर काम करत असताना शॉक लागून खाली पडल्याने ४० वर्षीय कंत्राटी कामगाराचा मृत्यू झाल्याची घटना मंगळवारी सकाळी साडेनऊ वाजेच्या सुमारास घडली.

याबाबत अधिक माहिती अशी की, वरणगाव ऑर्डनन्स फॅक्टरी येथील वसाहत मधील टाईप फाईव्ह परिसरात इलेक्ट्रिक पोलवर विज प्रवाह सुरू असतांना सुनिल अशोक सपकाळे (वय ४०) हा कंत्राटी कामगार खांबावर चढून काम करत होता. या कर्मचाऱ्यास जोरदार इलेट्रीक शॉक लागल्याने तो खांबावरून जमिनीवर पडला, त्याच्या मेंदूला जबरदस्त मार लागल्याने व त्याच्या कानातून रक्त आल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला आहे. या कामगाराकडे कोणतेही सेप्टी उपकरण नसल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. त्याला ऑर्डनन्स फॅक्टरी दवाखान्यात आणले असता डॉक्टरांनी मृत घोषित केले, घटनेची माहिती त्याच्या घरी कळताच मृतांचे नातेवाईक दवाखान्यात जमा झाले. त्यांनी मृतदेह घेण्यास नकार दिला. घटनेची सखोल चौकशी व मृताच्या नातेवाईकांना भरपाई मिळाल्याशिवाय मृतदेह ताब्यात घेणार नसल्याचे नातेवाईकांनी सांगितले.



सदर व्यक्ती हा भिरूड इलेक्ट्रिकल्स या ठेकेदाराकडे काम करीत असल्याचे समजते, ठेकेदार कंत्राटी कामगारांना कोणतेही सुरक्षेचे उपकरण देत नसून फक्त काम करून घेण्याचे कार्य याठिकाणी होत असल्याने अशा दुर्दैवी घटना घडत असतात. या कामगारास सुरक्षा हेल्मेट दिले असते तर ही दुर्दैवी घटना घडली नसती असे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले. तसेच चालू असलेल्या लाईनवर काम करतांना ही घटना घडल्याने इलेक्ट्रीक शट डाऊन करून व परमिट घेवून काम करणे गरजेचे होते. या सर्व घटनेस जबाबदार कोण? असे प्रश्न निर्माण झाले आहेत. घटना घडल्यानंतर फॅक्टरीचे महाप्रबंधक तब्बल तीन तासानंतर दवाखान्यात पोहोचले त्यामुळे नाराजी व्यक्त करण्यात आली. यावरून ठेकेदारी कर्मचाऱ्या विषयी प्रशासन किती जागृत आहे हे लक्षात येते. यावेळी कामगार युनियन, इंटक युनियन व भारतीय मजदूर संघ या संघटनांनी महाप्रबंधक यांना सदर घटनेबाबत दखल घेण्यासाठी त्वरीत भेट घेवुन तातडीने कारवाई करण्याचे सांगितले व पुन्हा अशा घटना घडू नये म्हणून उपाय योजना करण्याचे सांगितले.

पीआरपी चे नेते जगन सोनवणे यांनी या ठिकाणी येऊन मृतांच्या नातेवाईकांना शांत राहण्याचा सल्ला दिला व संबंधित ठेकेदाराला बोलावून व समज देवून याबाबत मृताच्या नातेवाईकांना भरपाई मिळवून दिल्याने सहा तासानंतर नातेवाईकांनी मृतदेह ताब्यात घेतला. मयताचे शव विच्छेदन वरणगाव ग्रामिण रुग्णालयात करण्यात आले. यावेळी वरणगाव पोलीस स्टेशनचे पोलीस अधिकारी एपीआय भरत चौधरी व कर्मचारी दवाखान्यात येऊन घटनेची नोंद घेतली. या घटनेबाबत वरणगाव पोलीस स्टेशनला अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

मयत सुनिल सपकाळे भुसावळ तालुक्यातील शिंदी–सुरवाडा येथील रहिवासी असून त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले व एक मुलगी असा परिवार आहे. या घटनेने वरणगाव फॅक्टरी परिसरात घबराटीचे वातावरण निर्माण झाले आहे. यापूर्वी ही अशा घटना घडल्या असून या ठेकेदारांबाबत प्रशासन कोणतेही कारवाई करत नसल्याने अशा घटनेत कामगारांचे जीव जात आहेत याला जबाबदार कोण? असे प्रश्न निर्माण होत आहे.

## कल्याण

| दि. | सोम | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि |
|---|---|---|---|---|---|---|
| ०८-०४-२०२४ १३-०४-२०२४ | ३४७-४४-३३८ | २५५-३२-२५५ | २३३-८८-५५८ | १७०-८३-२२९ | ६००-६४-३४७ | ३६७-६७-२२३ |
| १५-०४-२०२४ २०-०४-२०२४ | ११२-४६-७९० | २७०-९७-१६० | ३५७-५२-६७९ | ९९०-८१-१३७ | ३७०-०२-३४५ | २३५-०४-६८० |
| २२-०४-२०२४ २७-०४-२०२४ | ५६९-०३-२५६ | २४८-४९-५७७ | २५७-४२-१४७ | १६०-७८-४६८ | ३५८-६७-८९० | ५६९-०२-३९० |
| २९-०४-२०२४ ०४-०५-२०२४ | ७७९-३३-५८० | ५६८-९२-१३८ | २३०-५८-१८९ | ३४९-६०-१३६ | १४५-०८-४६८ | ३९०-२४-२५७ |
| ०५-०५-२०२४ ११-०५-२०२४ | १४७-२७-२५० | ५८९-२१-३३५ | ३५७-५४-३४७ | ३५९-७९-१८० | ६६८-०१-४८९ | १५८-४४-७८९ |
| १३-०५-२०२४ १८-०५-२०२४ | २३४-९८-३६९ | १४९-४०-५६९ | ३४७-४५-२४९ | ५६८-९६-४५७ | २६७-५३-७७९ | २३८-३०-१९० |
| २०-०५-२०२४ २५-०५-२०२४ | १५६-२६-१५० | ३४९-६६-११४ | १३३-७०-११८ | १३६-०२-५८९ | ३९९-१६-२४० | ३४७-४२-१४७ |
| २७-०५-२०२४ १-०६-२०२४ | | | | | | |

## मिलन डे

| दि. | सोम | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि | रवि |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०८-०४-२०२४ १४-०४-२०२४ | २४६-२५-२४९ | ४४८-६०-२२६ | २४९-५६-२६८ | १४८-३७-५५७ | १३८-२१-५७९ | १३८-२६-२५९ | ● |
| १५-०४-२०२४ २१-०४-२०२४ | २६९-४०-६६८ | ३४०-४२-५७० | ७७८-२५-१७७ | १२५-८८-३५० | ५६७-८६-१७८ | ३७०-०४-१६७ | ● |
| २२-०४-२०२४ २८-०४-२०२४ | २४६-२७-१७९ | २३५-०७-७०० | ३५८-६६-३५८ | २२६-०६-२४० | ४४५-३१-११९ | २६०-८०-२३५ | ● |
| २९-०४-२०२४ ०५-०५-२०२४ | ३४६-३३-१३९ | १८९-८९-१२६ | ४६९-९५-३५७ | ३६९-८९-३७९ | १७७-५६-१६९ | २६८-६६-१७८ | ● |
| ०५-०५-२०२४ ११-०५-२०२४ | ६००-६४-१५८ | १७९-७९-१३५ | ११६-८३-६७० | ६८८-२९-११९ | ९००-९४-११२ | १२४-७७-२६९ | ● |
| १३-०५-२०२४ १९-०५-२०२४ | २७९-८२-१३८ | १४७-२९-२३४ | १६७-४९-३७९ | ४५७-६५-१४० | ३३४-०८-१७० | ५९९-३७-११५ | ● |
| २०-०५-२०२४ २६-०५-२०२४ | ११४-६५-६९० | १६०-७७-३४० | १३५-९४-७८९ | २५७-४३-६७० | ६८९-३५-२६७ | २३८-३८-१७० | ● |
| २७-०५-२०२४ १-०६-२०२४ | | | | | | | ● |

## मिलन नाईट

| दि. | सोम | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि | रवि |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०८-०४-२०२४ १४-०४-२०२४ | १२६-९१-३९९ | १६०-७८-५६७ | २३०-५१-५६० | २८०-०४-३४७ | ५७८-०६-३५८ | १३९-३५-१६८ | ● |
| १५-०४-२०२४ २१-०४-२०२४ | ४५५-४१-१९९ | ४७९-०३-२३८ | ४६७-७३-४९० | ६७०-३९-४७८ | ७७९-३९-३६० | ६६९-१०-५७८ | ● |
| २२-०४-२०२४ २८-०४-२०२४ | १२६-९०-५६९ | १७९-७१-५६० | १७८-६९-४७८ | १४८-३१-६६९ | २४०-६५-१६८ | १४६-१३-१३८ | ● |
| २९-०४-२०२४ ०५-०५-२०२४ | २७८-७८-४५९ | १५५-१९-३७९ | २५६-३९-९०० | ३३६-२९-१८० | २३५-०२-१२९ | २८०-०९-४५० | ● |
| ०५-०५-२०२४ ११-०५-२०२४ | ४६८-८२-१२९ | ४००-४०-२४४ | १३७-१७-४४९ | २३९-४३-२४७ | २७९-८९-४७८ | ४७८-९१-१३७ | ● |
| १३-०५-२०२४ १९-०५-२०२४ | ४४५-३५-१४० | १६७-४३-३४६ | १६७-४६-८८० | ५९०-४२-५८९ | ३५०-८४-१५८ | १४९-४७-५५७ | ● |
| २०-०५-२०२४ २६-०५-२०२४ | ५९०-४०-१२७ | २४६-२५-६९० | ३५०-८६-३४९ | २४९-५७-१६० | ७८९-४४-१३९ | २४९-५७-२५० | ● |
| २७-०५-२०२४ १-०६-२०२४ | | | | | | | ● |

## निकाल — महाराष्ट्र राज्य लॉटरी — महाराष्ट्र गजराज मासिक सोडत

तिकिट किं. रु. 20/- • सोडत क्रमांक 05 • सोडत दिनांक 28/05/2024

| बक्षिस | क्रमांक |
|---|---|
| पहिले बक्षिस रु. 14 लाख | GJ-20 : 9535 |

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES

| बक्षिस | क्रमांक |
|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 10,000/- | 0755 |
| तिसरे बक्षिस रु. 2,000/- | 3076 |
| चौथे बक्षिस रु. 1,000/- | 9524 |
| पाचवे बक्षिस रु. 500/- | 0308 0827 2299 3361 4945 5749 6634 7325 8426 9049 |
| सहावे बक्षिस रु. 200/- | 1003 1242 2738 3908 5320 7757 8920 8954 9173 9561 |
| सातवे बक्षिस रु. 100/- | 0717 1201 1706 3803 5267 7464 7752 8106 8227 9053 |

आजच्या सोडतीत रु. 10000/- ची अंदाजित 7 बक्षिसे जिंकली

आठवे बक्षीस रु. 50/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 0009 | 0578 | 1259 | 2198 | 2968 | 4040 | 4554 | 5583 | 6351 | 7154 | 8181 | 9295 |
| 0015 | 0580 | 1283 | 2210 | 3013 | 4043 | 4566 | 5640 | 6361 | 7245 | 8282 | 9305 |
| 0032 | 0593 | 1377 | 2221 | 3037 | 4044 | 4634 | 5650 | 6448 | 7340 | 8320 | 9324 |
| 0036 | 0596 | 1380 | 2223 | 3049 | 4045 | 4650 | 5654 | 6496 | 7454 | 8420 | 9371 |
| 0039 | 0610 | 1391 | 2232 | 3103 | 4134 | 4766 | 5656 | 6530 | 7537 | 8434 | 9479 |
| 0055 | 0708 | 1420 | 2244 | 3135 | 4158 | 4885 | 5675 | 6548 | 7562 | 8488 | 9481 |
| 0067 | 0797 | 1509 | 2328 | 3212 | 4164 | 4893 | 5705 | 6551 | 7580 | 8548 | 9522 |
| 0086 | 0803 | 1534 | 2372 | 3266 | 4199 | 4915 | 5721 | 6577 | 7618 | 8574 | 9524 |
| 0106 | 0816 | 1568 | 2412 | 3304 | 4241 | 4920 | 5733 | 6621 | 7637 | 8578 | 9629 |
| 0156 | 0819 | 1616 | 2421 | 3338 | 4244 | 4954 | 5757 | 6641 | 7676 | 8628 | 9655 |
| 0202 | 0856 | 1710 | 2422 | 3387 | 4247 | 5037 | 5783 | 6650 | 7721 | 8679 | 9679 |
| 0205 | 0890 | 1829 | 2446 | 3397 | 4283 | 5041 | 5884 | 6676 | 7722 | 8683 | 9726 |
| 0216 | 0964 | 1856 | 2490 | 3398 | 4304 | 5068 | 5886 | 6795 | 7745 | 8701 | 9750 |
| 0232 | 0965 | 1866 | 2503 | 3497 | 4306 | 5117 | 5968 | 6796 | 7774 | 8760 | 9824 |
| 0268 | 0996 | 1891 | 2518 | 3502 | 4340 | 5265 | 5995 | 6822 | 7777 | 8763 | 9841 |
| 0294 | 1033 | 1913 | 2525 | 3531 | 4343 | 5270 | 5997 | 6892 | 7790 | 8814 | 9860 |
| 0296 | 1091 | 1961 | 2576 | 3538 | 4374 | 5313 | 6066 | 6925 | 7798 | 8819 | 9879 |
| 0370 | 1110 | 2041 | 2626 | 3609 | 4404 | 5345 | 6068 | 6936 | 7801 | 8827 | 9886 |
| 0395 | 1133 | 2042 | 2642 | 3630 | 4413 | 5352 | 6166 | 6963 | 7880 | 8859 | 9897 |
| 0415 | 1135 | 2112 | 2688 | 3703 | 4432 | 5420 | 6184 | 6969 | 7897 | 8881 | 9919 |
| 0420 | 1154 | 2139 | 2717 | 3713 | 4443 | 5434 | 6209 | 6976 | 7932 | 8914 | 9924 |
| 0456 | 1194 | 2149 | 2792 | 3835 | 4447 | 5451 | 6222 | 7031 | 8113 | 9045 | 9943 |
| 0472 | 1197 | 2171 | 2860 | 3858 | 4451 | 5475 | 6266 | 7075 | 8130 | 9059 | 9971 |
| 0555 | 1201 | 2181 | 2892 | 3971 | 4465 | 5509 | 6343 | 7098 | 8174 | 9096 | 9977 |
| 0570 | 1249 | 2189 | 2947 | 4022 | 4520 | 5575 | 6346 | 7134 | 8178 | 9172 | 9996 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी


## क्लासिफाईड

जाहिरात छोटी किमया मोठी

**सोमवार २७/०५/२०२४**

मधुर नाईट -४९९-६
धनलक्ष्मी नाईट -४८९-१
मेन बाजार -
मिलन ना.-३८०-१

**मंगळवार २८/०५/२०२४**

मधुर मॉर्निंग-३३०-६३-१४८
मधुर डे- १४८-३१-४८९
मधुर नाईट- २३५-०
धनलक्ष्मी डे- ३६०-९२-५७०
धनलक्ष्मी नाईट-३५६-४
मेन बाजार -
कल्याण-
मिलन डे -
मिलन ना.-

### दारुबंदीचा गुरुमंत्र

द ग्रेट साईंटिस्ट... (best doctor & gold medal awarded) डॉ. पालवे ॲडमिट करा... ।। नका करु... पेशंटला सांगा....।। नका सांगू.... पेशंटला आणा.... ।। नका आणू.... ✻ व्यसन पेशंटचे... विश्वास तुमचा... उपचार आमचे... Lifelong व्यसनापासुन १०० टक्के मुक्ती.... सर्व सुविधांनी परिपूर्ण:- ✻ व्यसनमुक्ती Special पॅक, मेडिसीन, इंजक्शन स्प्रे, ड्रॉप, ऑपरेशन, गोळी टाकणे, मंत्रोपच्चार... ॲडमिट सुविधा... ✻ (विशेष) गरीबांसाठी फी मध्ये सवलत... तर आजच संपर्क :- ९५५२६१९७५२. डॉ. पालवे नशामुक्ती केंद्र, वरणगाव. (६४६२/व्ही.एम./०९/०१/२५)(CRINV-2324JL/CRG00555)

### १००% व्यसनमुक्ती

✻ गॅरंटीने सोडवा. दारु + गुटखा + सिगारेट + बिडी + मावा + तंबाखु + बार + खैनी + भांग + गांजा + अफिम + जर्दा + ताडी + स्नेकबाईट + व्हाईट पावडर + व्हाईटनर + हिरॉईन + चरस + कोकेन + एमडी + एल.एस.डी. डॉट पेपर + झोपेची गोळी + इंजेक्शन... डॉ.पालवे नशामुक्ती केंद्र, वरणगाव मो.९५५२६१९७५२, www. drpalve nashamuktikendra.in १००% रिझल्ट. (६४६३/व्ही.एम./०९/०१/२५) (CRINV-2324JL/CRG00554)

### उपचार सर्वांसाठी सर्व आजारांसाठी

जुनाट सर्दी, जुनाट दमा, जुनाट गुडघे दुखी, चालता, बसता, उठता न येणे. जुनाट संधीवात / चिकन गुनीया, जुनाट ॲलर्जी, जुनाट अर्धशिशी, जुनाट मुळव्याध, एचआयव्ही, भुक लागत नाही?, वजन कमी? थकवा जाणवतोय?, Low CD4 Count? उपचार सर्वांसाठी, सर्व आजारांसाठी. भेटा - अहमदनगरचे सुप्रसिध्द डॉक्टर पालवे, वरणगाव मो. नं. ९५५२६१९७५२ (६४६४/व्ही.एम./ ०९/०१/२५) (CRINV-2324JL/CRG00556)

### देशदूत

धुळे आवृत्तीसाठी छोट्या जाहिरातील रु.५/-प्रतीशब्दाप्रमाणे स्वीकारल्या जातील. शब्दाची किमान मर्यादा १५ व कमाल मर्यादा ४०. सतत तीन दिवस दिल्यास चौथ्या, पाचव्या व सहाव्या दिवशी विनामूल्य. जाहिरातीच्या मजकूर दै. 'देशदूत'च्या छोट्या जाहिरातीच्या फॉर्मवर सुबक अक्षरात लिहून दै. 'देशदूत', 'देशदूत कार्यालय' राणी मेडीकल शेजारी, ग.नं. ६ ,धुळे ४२४००१. संपर्क धुळे-२३७९१४ फॅक्स २३८९१४.

### सूचना

वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातीतील मजकुराची शहानिशा करुनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात, त्याची 'देशदूत' वृत्तपत्र समूह कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पूर्तता जाहिरातदाराकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल 'देशदूत' वृत्तपत्र समुहाचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.


cmyk



## शॉर्ट न्यूज

### कला शाखेत काजल जैन प्रथम

■ धुळे । प्रतिनिधी



येथील विद्यावर्धिनी सभेचे डॉ. एम. वाय. वैद्य कला, प्रा. पी. डी. दलाल वाणिज्य व डॉ. डी. एस. शहा विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयांच्या कला आणि वाणिज्य शाखांचा बारावीचा निकाल १०० टक्के लागला असून काजल सचिन जैनने ८६ टक्के गुण मिळवीत कला शाखा व महाविद्यालयातून प्रथम तर रिद्धी संतोष सिंघानी हिने ८२.६७ टक्के गुण मिळवून विज्ञान शाखेतून प्रथम क्रमांक मिळविला आहे. विज्ञान शाखेत विधी चंद्रशेखर पाटीलने दुसरा, सावरी नवनीत अमृतसागरने तिसरा क्रमांक मिळवला आहे. कला शाखेतून वैशाली धनलाल चौरेने द्वितीय व वरधनी बबन पावराने तृतीय क्रमांक मिळवला आहे. वाणिज्य शाखेत भूमी नरेश अटलानी हिने ८४.८३ टक्के गुण मिळवून प्रथम तर अमित संदीप सोनार व कार्तिक गिरीश ज्ञानचंदानी यांनी द्वितीय आणि विवेक प्रमोद जाधव यांनी तृतीय क्रमांक प्राप्त केला आहे. विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल प्रा. शरद पाटील, अक्षय छाजेड, युवराज करनकाळ, केशव बहाळकर, उदय शिनकर, प्राचार्य डॉ. मधुकर वानखेडे, पर्यवेक्षक पंजाबराव व्यास यांनी कौतूक केले आहे.

### विसपूते विद्यालयाचा गिरीश शिंदे प्रथम

■ धुळे । प्रतिनिधी



शहरातील बापूसाहेब डी. डी. विसपूते माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा दहावीचा निकाल ९२.८५ टक्के लागला असून त्यामध्ये गिरीश दत्तात्रय शिंदे याने ८३.६० टक्के गूण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. तर भाविका छोटू मोहीते हिने ८०.८ टक्के गुण मिळवून द्वितीय क्रमांक, अंकिता मोरे तृतीय क्रमांकाने ७७ टक्के गुण मिळवून उत्तीर्ण झाले. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे महेंद्र विसपूते, स्मिता विसपूते, प्राचार्य पी.बी.पाटील, एस.आर. पाटील, डी.डी.पवार, ए.के. पाटील, एस.बी.भदाणे, विजय देसले, अपर्णा पाटील, महेंद्र बाविस्कर, तुषार कुलकर्णी आदींनी कौतूक केले आहे.

### कर्ले विद्यालयात जान्हवी ठाकरे प्रथम

■ दोंडाईचा । प्रतिनिधी



कर्ले ता. शिंदखेडा येथील ज्ञानोपासक शिक्षण मंडळीचे इंदिरा गांधी माध्यमिक विद्यालयात दहावीत जान्हवी दादाभाऊ ठाकरे ही विद्यार्थिनी शाळेत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाली तिला ८७.२० टक्के गुण मिळाले असून द्वितीय मोहीनी नरेन्द्र चव्हाण, तृतीय भाग्यश्री नामदेव चव्हाण तर चतुर्थ हर्षल अनिल पाटील यांनी मिळविला, शाळेचे मुख्याध्यापक नांदरे यांनी विद्यार्थिनीचे कौतुक केले. जान्हवी ही कर्ले गावाच्या सरपंचै सिमा दिनेश ठाकरे यांची पुतणी तर ग्राम रोजगार सेवक दादाभाऊ ठाकरे यांची कन्या आहे.

# मतमोजणीसाठी प्रशासन सज्ज

■ धुळे । प्रतिनिधी



धुळे लोकसभा मतदार संघात मतमोजणीला सुरूवात दि. ४ जून रोजी सकाळी ८ .०० वाजेपासून शासकीय धान्य गोदाम, नगावबारी, देवपूर, धुळे येथे होणार आहे. मतमोजणीची प्रक्रिया निर्विघ्नपणे पार पडण्यासाठी मतमोजणीसाठी नियुक्त नोडल अधिकाऱ्यांनी आपल्यावर सोपविलेली जबाबदारी एकमेकांशी समन्वय साधून पार पाडावी, असे निर्देश जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी अभिनव गोयल यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन सभागृहात आयोजित धुळे लोकसभा मतदार संघ मतमोजणी पूर्वतयारी आढावा बैठकीत ते बोलत होते. बैठकीस जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत पवार, मनपा अतिरिक्त आयुक्त करुणा डहाळे, उप जिल्हा निवडणुक अधिकारी गंगाराम तळपाडे, उपजिल्हाधिकारी संदीप पाटील, संजय बागडे, रोहन कुवर, तहसिलदार पंकज पवार, जिल्हा सूचना व विज्ञान अधिकारी महेश खडसे, सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी अर्चना भगत आदींसह नोडल अधिकारी, विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्री. गोयल म्हणाले की, धुळे लोकसभा मतदार संघाची मतमोजणी ४ जूनरोजी होणार आहे. मतमोजणीसाठी भारत निवडणूक आयोगाचे निर्देशानुसार शासकीय धान्य गोदाम, नगावबारी, देवपूर, धुळे येथे मतमोजणी कक्ष तयार करण्यात आला आहे. याठिकाणी मतमोजणीसाठी भारत निवडणूक आयोगाने मंजूर केलेल्या आराखडाप्रमाणे मतमोजणी टेबल व्यवस्था, तसेच निवडणूक निरीक्षक, निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या बैठकीची व्यवस्था करण्यात आली आहे. मतमोजणी कक्षात अखंडीत विद्युत पुरवठा सुरळीतपणे सुरु राहील याप्रमाणे नियोजन करावे. प्रत्येक विधानसभा मतदारसंघनिहाय सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली आहे. उमेदवार, उमेदवारांचे प्रतिनिधी, माध्यम प्रतिनिधींची बैठकीची व्यवस्था तसेच आवश्यक तेथे लाऊडस्पिकर बसविण्यात आले आहेत.

मतमोजणीसाठी आवश्यक मनुष्यबळाचा अंदाज घेऊन मतमोजणी पर्यवेक्षक, मतमोजणी सहायक, सुक्ष्म निरीक्षक, शिपाई यांची नियुक्ती करण्यात शेणार आहे. मतमोजणी कक्षात प्रत्येक विधानसभा मतदार संघनिहाय इंटरनेट सुविधा उपलब्ध करुन दिली असून इटीपीबीएस मोजणीसाठी आवश्यक संगणक, स्कॅनर, प्रिंटर, बारकोड रिडरची व्यवस्था, आवश्यकतेनुसार सीसीटीव्हीची व्यवस्था करण्यात आली आहे. इनकोअर प्रणालीत मतमोजणीची सर्व माहिती काळजीपुर्वक भरावी. मतमोजणी संदर्भात आवश्यक माहिती व अहवाल वेळेत आयोगास सादर करण्यासाठी आवश्यक ते नियोजन तसेच मतमोजणीच्या परिसरात वाहनतळ, वैद्यकीय सुविधा, स्वच्छतागृह, अग्निशमन यंत्र तसेच पिण्याचे पाणी उपलब्ध करुन द्यावे, सर्व संबंधित नोडल अधिकाऱ्यांवर सोपविलेली जबाबदारी प्रत्येकाने चोखपणे पार पाडावीत, अशा सूचनाही जिल्हाधिकारी श्री. गोयल यांनी दिल्यात.

## पाणीटंचाईचा प्रश्न सोडवा; राष्ट्रवादीचे निवेदन

■ धुळे । प्रतिनिधी



नागरिकांना सात ते आठ दिवसानंतर पाणी मिळत आहे. भाजपाने धुळेकरांची फसवणूक केली असून शहरातील नागरिकांना सुरळीत, वेळेवर व शुद्ध पाणीपुरवठा करावा, अशी मागणी शहर राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाने मनपाच्या अतिरिक्त आयुक्तांची भेट घेवून त्यांच्याकडे केली.

यावेळी रणजीत भोसले, जोसेब मलबारी, राजेंद्र सोलंकी, राजू डोमाळे, अशोक धुळकर,वाल्मीक मराठे, डी.टी पाटील, दीपक देवरे, जयश्री घाटे, भिका नेरकर, बरकत शाह, राजू चौधरी, राजेंद्र चौधरी, बंटी वाघ, आकाश बैसाणे, गोलू नागमल, भूषण पाटील, दीपक देवरे, सलमान खान, सोनू गुजर, सोनू घारू, युसुफ शेख, निखिल मोमया, भटू पाटील, कल्पेश मगर, जीवन चव्हाण, रामेश्वर साबरे, बंटी बोरसे आदींसह कार्यकर्ते उपस्थित होते. याबाबत दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, शहरांमध्ये भीषण पाणीटंचाई जाणवत आहे. काही भागांमध्ये आठ-आठ दिवस पाणी येत नाही. ज्या भागांमध्ये पाणी येते ते गढूळ येत आहे. ठिकठिकाणी जलवाहिन्या खराब झालेल्या आहेत. अक्कलपाडा धरणातील आलेले पाणी पूर्ण क्षमतेने मिळत नाही. मोहाडी सारख्या भागांमध्ये महिन्यातून फक्त दोनदा पाणी मिळालेले आहे. करोडो रुपयांचा निधी हा पाणीपुरवठ्यासाठी आणण्याचा भाजपाचा दावा फोल ठरलेला आहे. भाजपाने शब्द दिला होता की, एका दिवसाआड किंवा दररोज पाणी देऊ. पण आज धुळे शहरातील नागरिकांना सात ते आठ दिवसानंतर पाणी मिळत आहे. कॉलनी परिसरामध्ये तर पाणी मिळावे, म्हणून काही कर्मचारी रजा टाकून घरी राहत आहे. त्यामुळे पाणीप्रश्न सोडवावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

## महापालिकेत राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रम

■ धुळे । प्रतिनिधी

३१ मे हा दिवस राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण दिवस म्हणून साजरा करण्यात येतो त्या अनुषंगाने महापालिका व जिल्हा रुग्णालय यांच्या संयुक्त विद्यमाने तंबाखू नियंत्रण कार्यक्रम घेण्यात आला.

कार्यक्रम अति.आयुक्त करुणा डहाळे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आला. महापालिकेचे आरोग्यधिकारी डॉ.एम.आर शेख, जिल्हा रुग्णालयाचे तंबाखू नियंत्रण नोडल अधिकारी डॉ.नितीन पाटील, दंतचिकित्सक डॉ. स्वप्नील देवरे, समुपदेशक जयश्री चौधरी, सामाजिक कार्यकर्ती धनश्री बच्छाव, कार्यक्रम सहाय्यक महेंद्र नेरकर, जिल्हा सल्लागार राहुल नेरकर उपस्थित होते.

कार्यक्रमाला राजेश वसावे, लक्ष्मण पाटील, विकास साळवे, महेंद्र ठाकरे, चेतन अहिरे,गजानन चौधरी, प्रमोद चव्हाण उपस्थित होते. सूत्रसंचालन वाहिद अली सैय्यद यांनी केले.

## धुळ्यात विनापरवाना दुचाकी चालविणाऱ्या १३ युवकांवर कारवाई

■ धुळे । प्रतिनिधी

शहर वाहतूक पोलिसांना १३ युवक विनापरवाना दुचाकी चालविताना आढळून आले. यातील १३ युवकांच्या पालकांना प्रत्येकी पाच हजारांचा दंड आकारण्यात आला. यातील काही तरुण अल्पवयीन असल्याचे समोर आल्याने त्यांच्या पालकांना पोलीस ठाण्यात बोलवून समज देण्यात आली.

शहरातील वाढते अपघाताचे प्रमाण पाहता डीवायएसपी ऋषिकेश रेड्डी यांनी शहर वाहतूक शाखेला सोबत घेवून काल मोहिम राबविली.

या मोहिमेत तरुणांना थांबवून त्यांच्याकडे लायसन्सची तपासणी करण्यात आली. या तपासणीत एकूण १३ तरुणांकडे लायसन्स नसल्याचे आढळले. यात अल्पवयीन तरुणांचाही समावेश होता. त्यामुळे या सर्व १३ जणांच्या दुचाकी जप्त करुन शहर वाहतूक शाखेत आणण्यात आल्या. या सर्व तरुणांना प्रत्येकी पाच हजारांचा दंड आकारण्याची कारवाई करण्यात आली. तसेच संबंधित तरुणांच्या पालकांना बोलवून त्यांनाही समज देण्यात आली. वरील सर्व १३ विद्यार्थ्यांविरुध्द मोटार वाहन कायदा कलम ३(१),१८१ विना लायसन्स वाहन चालविणे यामुळे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर कारवाई एसपी श्रीकांत धिवरे, अपर पोलीस अधीक्षक किशोर काळे, डीवायएसपी ऋषिकेश रेड्डी यांच्या मार्गदर्शनात शहर वाहतूक शाखेचे एपीआय भूषण कोते, हेकॉ राजू पवार, विजय



वाघमोडे, आरिफ शेख यांच्या पथकाने केली.

# आर.सी.पटेल शैक्षणिक संकुलाच्या २१ शाखांचा दहावीचा निकाल १०० टक्के

■ शिरपूर । प्रतिनिधी

आर.सी.पटेल शैक्षणिक संकुलाच्या २१ शाखांचा दहावीचा निकाल १०० टक्के लागला असून कनक पाटील व दीपक पवार हे दोन विद्यार्थी ९८ टक्के गुण मिळवून धुळे जिल्ह्यात प्रथम प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाले आहेत.

संस्थेतील सर्व शाखांमधील विद्यार्थ्यांनी यशाची परंपरा कायम राखली आहे. संपूर्ण संस्थेचा निकाल १०० टक्के लागला आहे. यात सुमारे ८१४ विद्यार्थ्यांनी ९० टक्के पेक्षा जास्त गुण प्राप्त केले असून उर्वरित सर्व विद्यार्थी विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाले आहेत.



आर.सी.पटेल इं. मिडी. सेकं. स्कूल, शिरपूरची पाटील कनक प्रमोद ९८ टक्के गुण मिळवून धुळे जिल्ह्यात प्रथम, वाधवानी हनिष्का हरिष ९७.२०, जाधव लक्षिका गोविंद ९७.२०, राजपूत सृष्टी महेंद्र ९७.२०, जमादार धनश्री जितेंद्रसिंग ९६.८०, मेनारिया विद्या कमलशंकर ९६.८०, पवार मधुरा सुनिल ९६.८०, जाधव श्रावणी दिपक ९६.६०, मुंदडा मिष्टी आनंदा ९६.६० टक्के गुण मिळाले.

आर.सी.पटेल माध्यमिक विद्यालय, शिरपूरचे पवार दीपक शिवाजी ९८, सुर्यवंशी तुषार निंबा ९६.६०, दलाल गोपाल अनिल ९६.४०, कोल्हे सुरज किसन ९५.२०, पाटील मनिष जयवंतराव ९५.२०, शेटे कुणाल प्रविण ९५, धनगर दीपक संजय ९५ टक्के तर एच.आर.पटेल कन्या माध्यमिक विद्यालय, शिरपूरचे चौधरी सिध्दी राकेश ९७.८०, वाडिले स्नेहल गणेश ९७.२०, राजपूत नेहा चंद्रकांत ९६.८०, जैन प्राची विनोद ९६.८०, कलाल प्रणीता प्रविणकुमार ९६.६०, पाटील रुपल मोहन ९६.६०, माळी रक्षा सचिन ९६.६०, पाटील नंदिनी किशोर ९६.६०, राजपूत संजिवनी योगेंद्रसिंग ९६.४० टक्के गुण मिळाले.

आर.सी.पटेल माध्यमिक विद्यालय, खर्दे बु. चे भोई भुपेश अनिल ९४.६०, पाटील हिमांशु सुनिल ९३.४०, काटकर सोहम नरेंद्र ९२.६०, मिस्तरी नाविन्य भास्कर ९२.२०, बागुल मयुरी महेंद्र ९२ टक्के तर आर.सी.पटेल माध्यमिक विद्यालय, भोरखेडाचे शिरसाठ दिपाली कैलास ९४.६०, पवार संध्या रविंद्र ९३.६०, कोळी नंदिनी प्रकाश ९३, राजपूत भाविका हितेंद्रसिंग ९३, गुजर वैष्णवी बाळू ९२.८०, निकम पुर्वा दत्त ९२.६०, जमादार हर्षितसिंग दिनेशसिंग ९२.६० टक्के तर आर. सी.पटेल माध्यमिक विद्यालय, टेकवाडेचे पटेल हेमंत प्रकाश ९३.२०, वाघ धिरज संजू ९२.६०, शिरसाठ रोहिणी गणेश ९२.२०, चौधरी प्रतिक्षा साहेबराव ९१.६०, भोई सुप्रीया बापू ९१.४०टक्के गुण मिळाले.

एच.आर.पटेल कन्या माध्यमिक विद्यालय, वरुळचे पाटील निकिता सर्जेराव ९५.२०, पवार हर्षदा हेमंत ९५, पाटील अंकिता रविंद्र ९४.४०, बोरसे अश्विनी रावसाहेब ९३.२०, परदेशी वैष्णवी जगदीश ९२.६० टक्के तर आर.सी.पटेल माध्यमिक विद्यालय, खंबाळेचे पावरा अंकित सुनिल ९३.२०, पावरा शाम ताराचंद ९२.८०, पावरा उज्ज्वला मंगलसिंग ९२.४०, पावरा प्रेम दिनकर ९२, पावरा सागर राजाराम ९१.४० तर आर.सी.पटेल माध्यमिक विद्यालय, अहिल्यापूरचे तवर चंद्रपाल हिंमतसिंग ९३.४०, राजपूत पृथ्वीराज प्रेमसिंग ९३.४०, गिरासे दर्शन महेंद्रसिंग ९३.२०, जावळे हितेश आधार ९२.४०, पाटील दर्शना विजय ९२.४०, बावा कुणाल विनोद ९२, पाटील प्रगती नंदु ९१.६०, मंगळे प्रज्ञा दिनकर ९१.६०, शिरसाठ नेहा कृष्णा ९१.६०, नगराळे सागर सुरेश ९१.६० टक्के गुण मिळाले.

आर.सी.पटेल माध्यमिक विद्यालय, सावळदेचे ढोले गणेश कैलास ९५.२०, धनगर मयुर किशोर ९४, पाटील इशांत किशोर ९२.८०, भिल प्रियंका राजू ९२, पाटील ललित भालचंद्र ९१.८० टक्के तर आर. सी.पटेल माध्यमिक विद्यालय, बभळाजचे शिरसाठ भावना आत्माराम ९५.२०, पाटील वैष्णवी ज्ञानेश्वर ९५, सावंत जान्हवी विलास ९४.८०, पाटील रितू ज्ञानेश्वर ९४.६०, पाटील जयश्री नरेंद्र ९४.२० टक्के गुण मिळाले.

आर.सी.पटेल माध्यमिक विद्यालय, गरताडचे पाटील वैष्णवी प्रकाश ९२.४०, पाटील वेदांत जितेंद्र ९१.८०, थाटसिंगर रोहित सुरेश ९१.६०, सोनवणे भुमिका श्यामकांत ९१.४०, पाटील संस्कार ईश्वर ९१ टक्के तर आर.सी.पटेल माध्यमिक विद्यालय, पिळोदाचे कोळी देवयानी संतोष ९३.२०, पाटील रोशन सतिष ९२.४०, करंकाळ वैष्णवी नगीनदास ९१.६०, बोरसे कोमल धनंजय ९१, कोळी मनोहर धनराज ९१, पाटील नम्रता विजय ९० टक्के गुण मिळाले.

आर.सी.पटेल माध्यमिक विद्यालय, भामपूरचे कोळी हृदया संजय ९३.८०, पाटील मयुर अरुण ९३.८०, पवार सृष्टी जगदिश ९३.२०, कासोदे समिक्षा श्रीकृष्ण ९२.४०, पाटील अश्विनी शांताराम ९२.४०, पिंजारी फिजा शरीफ ९२.४०, देवरे नेहा भरत ९२.२०, शिरसाठ भावेश धनराज ९२.२०, पाटील अश्विनी विश्वास ९०.४०, राजपूत भुषण राजेंद्र ९०.४० टक्के तर आर.सी.पटेल माध्यमिक विद्यालय, होळनांथेचे राजपूत श्रावणी विकास ९५.२०, राजपूत दिव्यानी सुनिल ९५, राठोड पायल राजाराम ९४.२०, शेटे तुषार दिलीप ९४.२०, सोनवणे स्नेहल विलास ९४.२०, जाधव योगराज मोहन ९४, राजपूत निमिषा प्रविणसिंग ९३.८० टक्के गुण मिळाले.

आर.सी.पटेल माध्यमिक विद्यालय, झेंडेअंजनचे देशमुख दिव्या भरत ९१.६०, पावरा अरुण सुनिल ८९.६०, शिंदे दिव्या सुरेश ८९.६०, पावरा सती गुलामज्या ८९.२०, पराडके निकीता विक्रम ८७.६०, गवळी आशा तात्याजी ८७ टक्के, आर. सी.पटेल माध्यमिक आश्रमशाळा, शिरपूरचे पावरा पवन अविनाश ९२, पावरा रविना सुभाष ९१.६०, पावरा तेजस्विनी राधेशाम ९१, पावरा करण परशुराम ९०.८०, पावरा आर्यन भरत ९०.६०, पावरा संदिप कलीम ९०.६०, पावरा करिना नानसिंग ९०.६० टक्के, आर.सी.पटेल माध्यमिक आश्रमशाळा, वाघाडीचे पावरा कल्पेश विश्वास ९४, पावरा मंगेश मुकेश ९२.४०, पावरा मुकेश तेरसिंग ९१.८०, पावरा सितारा लहूसिंग ९१.४०, पावरा रंगिता भाया ९१.४०, पावरा अतुल दारासिंग ९१.४०, पावरा रिया रविंद्र ९१ टक्के, आर.सी.पटेल माध्यमिक आश्रमशाळा, निमझरीचे पावरा निरज छोटू ९२.२०, पावरा रोशनी सिताराम ९१.६०, पावरा विद्या कांतीलाल ९१.४०, पावरा नताशा नरेंद्र ९०.६०, पावरा नंदिनी अशोक ९०.६०, पावरा शुभम दिलीप ९०.४०, पावरा विनेश राजेंद्र ९०.४० टक्के तर आर.सी.पटेल उर्दु माध्यमिक विद्यालय, शिरपूरचे शेख फरहीन जमील ९०.४०, खाटीक उबेद जावीद ९०.२०, मन्यार अर्शिया बी इरफान ८९.६०, मन्यार रहेनुमा तालीब ८९, शेख जवेरीया रईस अहमद ८८.६०, तुर्क रहेमत नुरैन ८८.६० टक्के गुण मिळाले.

श्री विलेपार्ले केळवणी मंडळ मुंबई संचलित मुकेशभाई आर. पटेल बॉईज गर्ल्स मिलीट्री स्कूल, तांडेचे पाटील चेतन राजेश ९६, महाले भावेश किशोर ९६, टोंपे विधी निलेश ९५.८०, पटेल ओम मनोज ९५, पाटील श्लोक प्रभाकर ९४.४०, अहिरे जितेश बल्लु ९४ टक्के गुण मिळाले.

सर्व यशस्वी व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष, आ.अमरीशभाई पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, उद्योगपती चिंतनभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, सीईओ डॉ. उमेश शर्मा, अकॅडमिक इन्चार्ज पी.व्ही.पाटील यांनी कौतुक केले.

# पाचोरा मतदारसंघात बियाणे टंचाई

## अमोल शिंदे यांचा रस्त्यावर उतरण्याचा इशारा; भाजपला घरचा आहेर !

**पाचोरा । प्रतिनिधी**

पाचोरा -भडगांव तालुक्यातील शेतकऱ्यांना मुबलक प्रमाणात बियाणे उपलब्ध करून द्या, अन्यथा रस्त्यावर उतरु असा इशारा पाचोरा तालुका भारतीय जनता पक्षाचे तालुकाध्यक्ष तथा जळगाव लोकसभा मतदार संघांचे निवडणूक प्रमुख अमोल शिंदे यांनी दि.२६ रोजी घेतलेल्या पत्रकार परिषदेत बियाणे टंचाई विषयावरून सरकार विरोधात रस्त्यावर उतरण्याचा दिलेला इशारा लोकसभा निवडणुकीचा निकाल येण्यापूर्वी भाजपला घरचा आहेर मानला जात असून महायुतीत निकालापूर्वी खटके उडायला सुरुवात झाल्याच्या चर्चा मतदार संघांत सुरू झाल्या आहेत.

खरीप हंगामाच्या लागवडीला मोठ्या प्रमाणात सुरुवात झाली असून परिसरातील प्रमुख पीक असणारे कापूस बियाणे सध्या बाजारात उपलब्ध होत नसल्याने कापुस बियाण्याची टंचाई निर्माण झाली आहे. या संदर्भात भारतीय जनता पार्टीने आवाज उठवला आहे. पाचोरा व भडगाव तालुक्यातील शेतकरी खरीप हंगाम लागवडीच्या तयारीला लागले असून शेती मशागतिची कामे करून झाली आहे . कापूस लागवडीसाठी त्यांना आवश्यक असणारे कापूस पिकांच्या बियाण्याची टंचाई भासत असल्याने शेतकऱ्यांना मोठ्या अडचणीला सामोरे जावे लागत आहे. गेल्या काळात देखील दुष्काळ सदृश्य तालुक्याच्या नावाने पाचोरा व भडगाव तालुक्यातील शेतकऱ्यांची दिशाभूल झाली आहे. शेजारील चाळीसगाव तालुक्यातील आ. मंगेश चव्हाण यांनी त्यांचा चाळीसगाव तालुका दुष्काळग्रस्त घोषित करून घेण्याकरिता विशेष प्रयत्न करून १३३ कोटीचे पॅकेज चाळीसगाव तालुक्याला मंजूर करून घेतले. त्यामुळे तेथील शेतकऱ्यांना भरीव अशी मदत शासनाकडून मिळाली.

**लोकप्रतिनिधींच्या कार्य पद्धतीवर अप्रत्यक्ष आरोप !**

येथील स्थानिक लोकप्रतिनिधींनी पाचोरा - भडगाव तालुका दुष्काळग्रस्त घोषित करून घेतला नाही. फक्त दुष्काळ सदृश्य घोषित झाला असल्याचे सांगत मतदार संघांतील शेतकऱ्यांच्या तोंडाला पाने पुसली आहेत असा अप्रत्यक्ष आरोप पत्रकार परिषदेत करण्यात आला असून दुष्काळ सदृष्य घोषणेचा प्रत्यक्षात शेतकऱ्यांना कोणताही फायदा झाला नाही. दोन्ही तालुक्यातील शेतकरी आजही मदतीच्या आशेवरच आहे. त्यातच बियाणे टंचाई अशा बिकट परिस्थितीत शेतकऱ्यांच्या ऐन खरीप हंगामाच्या लागवडीला सुरुवात झाली असतांना शेतकऱ्यांना आवश्यकते नुसार बियाणे उपलब्ध होत नसल्याचे अमोल शिंदे यांनी सांगितले. भारतीय जनता पार्टीच्या वतीने या संदर्भात उपविभागीय अधिकारी पाचोरा यांना निवेदन देऊन याबाबतीत तात्काळ कृषी विभागाला सूचना कराव्यात व शेतकऱ्यांना मुबलक प्रमाणात बियाणे कसे उपलब्ध करून देता येईल अशा उपाययोजना कराव्या. आणि बियाणे टंचाई दूर करावी अन्यथा सत्ताधारी पक्षात असताना देखील पाचोरा व भडगाव तालुक्यातील शेतकऱ्यां करिता रस्त्यावर उतरून आंदोलन करू असा इशारा भारतीय जनता पार्टीच्या वतीने देण्यात आला आहे.या प्रसंगी माजी सभापती बन्सीलाल पाटील , प्रदिप पाटील, समाधान मुळे सह भाजपाचे पदाधिकारी उपस्थीत होते.



बयाणे टंचाई बाबत पत्रकार परिषदेत सरकारला इशारा देताना भाजपा तालुकाध्यक्ष अमोल शिंदे. (छाया - लक्ष्मण सूर्यवंशी)

## थोडक्यात...

### क.न.मंत्री माध्यमिक विद्यालय कासोदा १० वीचा निकाल

**कासोदा, ता.एरंडोल । वि. प्र.**



दि.२७ मे २०२४ रोजी इयत्ता दहावीचा निकाल घोषित झाला यात *पंचशील विकास मंडळ संचलित क नं. मंत्री माध्यमिक विद्यालयाचा ९४.२८% निकाल लागला* असून विद्यार्थ्यांनी घवघवीत यश प्राप्त करून संस्थेचे व शाळेचे नाव लौकिक केले. प्रथम १- गायत्री आनंदा वारे - ७९.२० टक्के, द्वितीय* २- स्वाती भुवनेश्वर पाटील - ७७.२० टक्के, तृतीय ३- तनिषा किशोर अंभोरे ७६.८० टक्के. सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष श्रीमती शोभाताई मंत्री सचिव श्री नीरज मंत्री व सर्व संचालक मंडळ व तसेच मुख्याध्यापक श्री एस पी बोरसे सर सौ साळुंखे मॅडम सौ पाटील मॅडम श्री गौतम सोनवणे सर सौ बडगुजर मॅडम श्री राठोड सर , दिनेश साळुंखे सर श्री गोपाल भाऊसाहेब श्री विठ्ठल चौधरी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आणि पुढील भावीवाटचालीस शुभेच्छा दिल्या.

### कोळगाव गो.पु.पाटील विद्यालयाचा दहावीचा शेकडा ९७.६१ टक्के निकाल

**गुढे, ता.भडगाव । वार्ताहर**

येथून जवळच असलेल कोळगाव येथील कमवीर तातयासाहेब हरी रावजी पाटील किसान शिक्षण सथा गो.पु.पाटील विदयालयाचा इयता इ.१० वी च्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळवले असून विद्यालयाचा निकाल हा *९७.६१ % लागला आहे.

प्रथम ५ आलेले विद्यार्थ्यांचे नावे खालील प्रमाणे -१)भाग्यश्री राहुल पाटील - ९०.८० टक्के, २)भाग्यश्री अरुण धनगर - ९०.२०टक्के, ३)साक्षी दिनेश पाटील - ८९.४०टक्के, ४)राजपूत पल्लवी गोविंद -८९.२०टक्के, ५)कोमलचंद्रशेखर पाटील- ८८.८०टक्के, *सर्व उत्तीर्ण व गुणवंत विद्यार्थ्यांचे आपल्या संस्थेचे चेअरमन प्रतापराव हरी पाटील संचालक जळगाव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक जळगाव तसेच संस्थेच्या व्हॉइस चेअरमन डॉ.पुनम प्रशांतराव पाटील संचालीका दुध संघ जळगाव,संस्थेचे सचिव प्रशांतराव विनायक पाटील उपसचिव मंत्रालय मुंबई, महाविद्यालयाचे प्राचार्य सुनील पाटील,पर्यवेक्षक तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन आणि कौतुक केले आहे, तसेच पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

### माध्यमिक विद्यालय शिंदी ता. भडगांव शाळेचा इ.१० वी चा निकाल १००टक्के

**गुढे, ता.भडगाव । वार्ताहर**

येथून जवळच असलेला शिदी येथील कर्मवीर तात्यासाहेब हरि रावजी पाटील किसान शिक्षण संस्था संचलित माध्यमिक विद्यालय शिंदी या शाळेचा इयत्ता १०वी चा निकाल१००% लागला असून विशेष प्राविण्य मिळवलेले विद्यार्थी पुढील प्रमाणे

१) निकिता किशोर महाजन ८१.६० टक्के, २) अस्मिता भगवान महाजन ८१.२०टक्के, ३) राजनंदिनी भास्कर पाटील ८०.४०टक्के, ३) राकेश आशोक महाजन ८०.४०टक्के, ३)करीना विष्णू पाटील ८०.४०टक्के, ४) रवींद्र दगडू शिंदे. ८०.००टक्के, ५) दिशा आधार पाटील ७९.८०टक्के. यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे चेअरमन प्रतापराव हरी पाटील संचालक जळगाव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक जळगाव तसेच संस्थेच्या सचिव डॉ.पुनम प्रशांतराव पाटील संचालीका दुध संघ जळगाव,संस्थेचे सन्माननीय सदस्य प्रशांतराव विनायक पाटील उपसचिव मंत्रालय मुंबई. विद्यालयाचे मुखयाध्यापक आर डी महाजन सर व सर्व शिक्षक शिक्षकेतर बंधू-भगिनींनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

### श्री स्वामी समर्थ माध्यमिक विद्यालयाचा ९८ टक्के निकाल

**पारोळा । श, प्र.र**



प्राची पाटील प्रियंका पाटील देवयानी पाटील

शहरातील शैक्षणिक संस्थामध्ये नावा रुपात असलेल्या श्री स्वामी समर्थ माध्यमिक विद्यालयाचा माध्यमिक शालांत परीक्षा मार्च २०२४ चा निकाल ९८ टक्के लागला असून यांत प्रथम क्रमांक पाटील प्राची मोतीलाल हिस ४५० गुण मिळवून ९० टक्के प्राप्त झाले. द्वितीय क्रमांक पाटील प्रियंका प्रदिप हिस ४२८ गुण मिळवून ८५.०६ टक्के मिळाले. तर तृतीय क्रमांक पाटील देवयानी विनोद हिस ४२५ गुण मिळवून ८५.०० टक्के मिळाले. शिक्षकांनी विदयार्थ्यांना उत्तम मार्गदर्शन केले तसेच नियमित सराव परीक्षा घेतल्यामुळे विदयालयाचा निकाल हा उत्कृष्ठ जाहिर झाला. विदयार्थ्यांना मिळालेल्या यशाबद्दल शाळेचे मुख्याध्यापक गोविंद टोळकर, संस्थेचे अध्यक्ष बापू नावरकर, अनिल टोळकर, गणेश बिचवे, देवेंद्र जैन, संजय पाखले, सोमनाथ टोळकर, सुनिल शहा तसेच इयत्ता दहावी वर्गाचे वर्गशिक्षक विजय निंबा चांदवडे , विदयालयाचे शिक्षक - शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

### जिल्हाधिकाऱ्यांचा पत्रकास महावितरणाचे दुर्लक्ष,कडक उन्हामुळे अबाल वृध्द त्रस्त

**नगरदेवळा, ता.पाचोरा । वार्ताहर**

नगरदेवळा व परीसरात कडक उन्हामुळे अतिशय उष्णता जाणवत आहे.वाढते तापमान लक्षात घेता घराबाहेर पडू नये,की, ज्यामुळे नागरीकांना उष्माघाताचा त्रास होणार नाही,दिवसा पंखे,कुलर लावा पंखे,असे पत्रक जिल्हाधिकारी यांनी काढले आहे,पंखे कुलर चालविण्यासाठी सतत विजपुरवठा लागतो,परंतु पावसाळा सुरू होण्यापूर्वी महावितरण कंपनी तर्फे जिल्हाधिकारी यांच्या पत्रकास केराची टोपली दाखवत ट्री कंटीगच्या नावाखाली विजपुरवठा खंडीत करत आहेत.तसेच आजपर्यंत झालेल्या वृक्षतोडी मुळे सर्वकडे उष्णतेचे प्रमाण वाढले असून तापमानाचा पारा दिवसें दिवस वाढत आहे,तरी जिल्हाधिकारी यांनी याकडे लक्ष देत खंडीत विजपुरवठा सुरळीत करण्याचे महावितरण कंपनीस आदेश द्यावेत.

## जादा दराने कापूस बियाणे विक्री करणारे पारोळा येथील कृषी विक्रेते यांच्यावर गुन्हा दाखल



**पारोळा । श. प्र.**

तालुक्यातील कृषी विक्रेते मे .गायत्री ॲग्रो एजन्सी , पारोळा कापूस बियाणे जादा दराने विक्री करत असल्याची गोपनीय माहिती दि.२६/०५/२०२४ रोजी कृषी विभागाच्या भरारी पथकास मिळाली. श्री कुरबान तडवी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी जळगाव श्री सुरज जगताप कृषी विकास अधिकारी जिल्हा परिषद जळगाव यांच्या मार्गदर्शनाखाली व गुप्त माहितीच्या आधारे जिल्हा भरारी पथकाने डमी ग्राहक म्हणून एक शेतकरी यांना मे.गायत्री ॲग्रो एजन्सीज विक्री वर पाठविले असता विक्रेते यांनी ८६४ रुपयास मिळणारे कापूस पिकाचे कबड्डी वाण बाराशे रुपये किमतीस शेतकऱ्यास विक्री करताना रंगे हात पकडले.

सदर घटनेच्या आधारे आज दिनांक २७ मे २०२४ रोजी पोलीस स्टेशन पारोळा येथे गु र न.१६९/२०२४ अन्वये जिल्हा गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक विकास बोरसे यांनी गुन्हा दाखल केला आहे. या कारवाईसाठी उपविभागीय कृषी अधिकारी अमळनेर सी डी साठे,विभागीय नियंत्रण निरीक्षक नितेंद्र पानपाटील, जिल्हा गुण नियंत्रण निरीक्षक विकास बोरसे, मोहीम अधिकारी विजय पवार, कृषी अधिकारी पंचायत समिती पारोळा श्री दिनेश कोते . कृषी सहायक श्री रोहित शिंदे यांनी परिश्रम घेतले. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक श्री. बाळू गीते करीत आहेत.



## प्रदीपकुमार कळसकर यांना मानद डॉक्टरेट पदवी देवून सम्मानित

**पारोळा । श. प्र.**

येथील बोहरा सेंट्रल स्कूलमधील हिंदी विभाग-प्रमुख प्रदीपकुमार सुरेश कळसकर यांनी हिंदी क्षेत्रात गेली १६ वर्ष केलेले योगदान, त्यांची सेवा लक्षात घेता दि.२५ मे २०२४ रोजी हैदराबाद येथे ग्लोबल इंटरनॅशनल फाऊंडेशन आणि राष्ट्रभाषा हिंदी सेवा संघ-हैदराबाद, ग्लोबल इंटरनॅशनल विद्यापीठ, अमेरिका द्वारा, ग्लोबल इंटरनॅशनल युनिव्हर्सिटी यूएसए कुलपती डॉ.सौरभ पांडेय, मिस एशिया युनिव्हर्स सुश्री.पूजा निगम, राष्ट्रभाषा हिंदी सेवा संघ अध्यक्ष डॉ.सुनील दुबे आदी मान्यवरांच्या हस्ते मानद डॉक्टरेट पदवी देवून गौरविण्यात आले._ते कै.सौ. कुसुम व श्री. सुरेश बारसु कळसकर (सेवानिवृत्त-माध्यमिक शिक्षक, शिरसोली, जळगाव) यांचे सुपुत्र आहेत.

## केशव माध्यमिक विद्यालय शाळेचा एसएससी परीक्षेचा ७४.०७ टक्के निकाल

**पारोळा । श. प्र.**



केशव माध्यमिक विद्यालयाचा१० विचा निकाल ७४.०७टकटक्के लागला असून (१) प्रथम आलेली विद्यार्थिनी :- पाटील निकिता लोटन एकूण गुण९०.८० टक्के, द्वितीय आलेला विद्यार्थी :- पवार गौरव रामराव ८५.६९ टक्के, ३) तृतीय आलेली विद्यार्थिनी :- पाटील भाग्यश्री रमेश ८४.४० टक्के मिळाले असून त्यांना शाळेचे अध्यक्ष संचालक मुख्याध्यापक शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले.

## तामसवाडी हायस्कुलचा ९२.६० टक्के निकाल

**पारोळा । श. प्र.**

तालुक्यातील तामसवाडी येथील ना. शि. मंडळाचे हायस्कूल व ज्यू.कॉलेज या संस्थेचा इयत्ता १० वीचा निकाल ९२. ,६० % लागला असून प्रथम पाच क्रमांकाने उत्तीर्ण झालेले विद्यार्थी खालील प्रमाणे -प्रथम - मानसी चुडामन खलाले - ८९ टक्के, द्वितीय दर्शन भाऊसाहेब कोळी- ८८.६०टक्के, तृतीय कुणाल अशोक पवार - ८८.२०टक्के, चतुर्थ महेश दिलीप मासरे ८७. ६० टक्के, व पाचवी देवयानी भागवत कोळी ८७.२०टक्के. वरील यशस्वी विद्यार्थी तसेच सर्व उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचे संस्थेचे चेअरमन डॉ. सतिष भास्करराव पाटील , संस्थेचे जेष्ठ संचालक हिरामण राजाराम पाटील, जळगाव जि.प.सदस्य रोहन सतिषराव पाटील, मा. वि.का.सो. चेअरमन प्रमोद हिरामण पवार, प्राचार्य ए. के.चव्हाण , पर्यवेक्षक डी.आर.पाटील , क्रीडा शिक्षक संदिप हिरामण पवार सर्व शिक्षक , शिक्षकेतर कर्मचारी वृंद यांनी हार्दिक अभिनंदन केले आहे.



प्रणवी पाटील कोमल महाजन अंकिता पाटील प्राची मिसाळ विनायक पाटील

## श्री.गो.से.हायस्कुल निकाल ९८:१३ टक्के

**पाचोरा । प्रतिनिधी**

पाचोरा तालुका सहकारी शिक्षण संस्था संचलित पाचोरा येथील श्री.गो.से. हायस्कुल मधील विद्यार्थ्यांनी एस.एस सी. परीक्षेत घवघवीत यश संपादन केले असून तालुक्यात प्रथम येण्याचा बहुमान विद्यालयास प्राप्त झाला.

या परीक्षेत शाळेचा ९८.१३% निकाल लागला आहे. १८९ विद्यार्थी विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाले आहेत. प्रथम क्रमांक पाटील प्रणवी ९७.६०टक्के, द्वितीय क्रमांक महाजन कोमल ९४.६० टक्के, तृतीय क्रमांक पाटील अंकिता ९४.०० टक्के, चौथा क्रमांक ,मिसाळ प्राची ९३.८० टक्के, पाटील विनायक ९३.८० टक्के, पाचवा क्रमांक वाकलकर हितेश ,९२.२० टक्के, सहावा क्रमांक सोमवंशी गुरुशरण ९३.०० %, पाटील हितेश,९३.०० टक्के, सातवा क्रमांक मार्कंड रितेश ९२.४० %,आठवा क्रमांक दुसाने सुदर्शन,९१.६० टक्के, नववा क्रमांक पाटील साक्षी दीपक,९१.४० टक्के, दहावा क्रमांक चिंचोले सिद्धी ,९१.२० टक्के सर्व गुणवंत व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष दिलीप ओंकार वाघ, चेअरमन संजय ओंकार वाघ, व्हा. चेअरमन व्ही.टी. जोशी, मानद सचिव ॲड. महेश देशमुख, संस्थेचे सर्व संचालक ,पदाधिकारी, शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. पी.एम. वाघ , उप मुख्याध्यापक सर्व शिक्षक - शिक्षिका , शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.

## जय योगेश्वर माध्यमिक विद्यालयाचा निकाल शंभर टक्के

**अमळनेर । वार्ताहर**



येथील जय योगेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा इयत्ता १० वीचा निकाल१००% लागला असून यावेळी ७१ विद्यार्थी परिक्षेस बसले होते, यात ७ विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य मिळवले तर २६ विद्यार्थीनी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत.

१) प्रथम : चैताली विजय पाटील -९२.२० टक्के,२) द्वितीय: क्रमांक नेहा बापू पाटील -९२टक्के, ३) तृतीय :क्रमांक मानसी दीपक चौगुले -९१.८०टक्के, ४) चतुर्थ: नंदिनी प्रवीण सोनवणे- ९१.६० टक्के,५) पाचवी-हर्षदा रवींद्र बोरसे ९१.००टक्के.

या यशवंत ,गुणवंत विद्यार्थ्यांनी दहावीच्या परीक्षेत यश संपादन के ले .

सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष श्री नानासो. डी .डी पाटील व संस्थेचे उपाध्यक्ष तथा प्राचार्य बापूसो के. डी पाटील व संस्थेचे संपूर्ण संचालक मंडळ व सर्व शिक्षक शिक्षिका,शिक्षकेतर कर्मचारी यांनी सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन केले आहे. तसेच पालक वर्गातून समाधान व्यक्त करण्यात आले आहे.

## श्री अखिलेशश्वरदासजी महाराज यांच्या हस्ते प्रकाश पाटील यांच्या कार्यालयाचा शुभारंभ

**अमळनेर । प्रतिनिधी**



केंद्रीय मार्गदर्शक मंडल धर्माचार्य प पू महामंडलेश्वर श्री अखिलेश्वरदासजी महाराज यांच्या शुभ हस्ते झाडी येथील मूळ रहिवासी व राष्ट्रपती पुरस्काराने सन्मानित गुजराथ एटीएस मधील निवृत्त पोलीस अधिकारी प्रकाशभाई आर पाटील यांच्या येथील जनसंपर्क कार्यालयाचा भव्य उद्घाटन सोहळा सकाळी ११ वाजता जल्लोषात संपन्न झाला.

सकाळी ७ वाजता केंद्रीय मार्गदर्शक मंडल धर्माचार्य प पू महामंडलेश्वर श्री अखिलेश्वरदासजी महाराज यांच्या शुभ हस्ते तालुक्यातील झाडी येथील मंदिरावर होमहवन संपन्न झाले. त्यानंतर महाराजांच्या हस्ते प्रकाशभाई पाटील युवा मंचच्या झाडी शाखेचे अनावरण करण्यात आले. याप्रसंगी झाडी परिसरातील महिला व पुरुष गावकरी मोठ्या संख्येने हजर होते. होमहवन झाल्यानंतर यावेळी प. पू. महामंडलेश्वर श्री. अखिलेश्वरदासजी महाराज यांचे महिला व पुरुष वर्गाने आशीर्वाद घेतले. त्यानंतर महाराजांसोबत झाडी येथील तरुणांची मोटारसायकल रॅली थेट अमळनेर शहरात पोहचली.

हॉटेल मिडटाऊन येथून सकाळी १० वाजेपासून घोड्यांच्या बग्गीवर केंद्रीय मार्गदर्शक मंडल धर्माचार्य प. पू. महामंडलेश्वर श्री. अखिलेश्वरदासजी महाराज यांचा मिरवणूक निघाली यावेळी मिरवणुकीत महिला व पुरुष वर्ग यांचा समावेश होता. मिरवणूकीचे हॉटेल ते सुभाष चौक, ते स्टेशन रोडवरून, तहसील कार्यालय व महाराणा प्रताप चौकातून धुळे रस्त्यावरील शिवांश बिझिनेस हब येथे कार्यालय स्थळी आगमन झाले. यावेळी ठिकठिकाणी महाराजांचे व प्रकाशभाई पाटील यांचे स्वागत करण्यात आले. त्यानंतर जनसंपर्क कार्यालयाचा महाराजांच्या हस्ते पूजा करून शुभारंभ झाला. त्यानंतर महाराजांच्या हस्ते रुग्णवाहिका शुभारंभ झाला.

यावेळी जेष्ठ उद्योगपती सरजू गोकलानी, माजी नगरसेवक लालू सैनानी, झाडी येथील जेष्ठ नेते धनगर दला पाटील,काँग्रेसचे नेते डॉ. अनिल शिंदे, राष्ट्रवादी (शरद पवार गट) माजी नगरसेवक श्याम पाटील, राष्ट्रवादी (शरद पवार गट) तालुकाध्यक्ष सचिन बाळू पाटील, शिवसेना ( उबाठा) चे पारोळा येथील नेते हर्षल माने, येथील कॉन्ट्रॅक्टर शिरीष पाटील, डॉ.प्रशांत शिंदे, हरि भिका वाणी, पारोळा येथील भाजपचे ड अतुल मोरे, उद्योजक वसंतबापू पाटील, चोपडा येथील राष्ट्रवादी काँग्रेसच्या (शरद पवार गट) चोपडा येथील नेत्या ज्योती पावरा (बारेला), सुरत येथील उद्योजक मित्र, सुरत येथील मित्रपरिवार, अमळनेर येथील प्रकाशभाई युवामंचचे प्रवीण देशमुख व युवा मंचाचे सदस्य, सुंदरपट्टी येथील माजी सरपंच सुरेश पाटील, गोवर्धन येथील शाम पाटील, झाडी येथील सरपंच डॉ. भुपेंद्र पाटील, अमळगावचे उदय नंदकिशोर पाटील, माजी नगरसेवक बाळा पवार,झाडी येथील गुणवंत पाटील, संतोष पाटील, ढेकूचे नथू आण्णा पाटील यांच्यासह विविध गावातील नागरिक मोठया संख्येने हजर होते. यावेळी अनेकांनी प्रकाशभाई पाटील यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. कार्यक्रम संपन्न झाल्यावर महाराजांचे हॉटेल मिडटाऊनकडे प्रस्थान झाले. यानंतर कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.

## आदर्श विद्यालयचा दहावीचा शंभर टक्के निकाल

**पारोळा । श. प्र.**



येथील न्यू पीपल्स एज्युकेशन सोसायटी संचालित आदर्श माध्यमिक विद्यालय व्यंकटेशनगर शाळेचे दहावीचे १००टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले. यात प्रथम क्रमांक साळुंखे जागृती मधुकर ९०.८०टक्के, द्वितीय क्रमांक पाटील अश्विनी हेमराज ८८.२०टक्के, तृतीय क्रमांक वाघ खुशबू पितांबर ८६.६०टक्के मिळवून यशस्वी झाले.यावर्षी दहावीला ४० विद्यार्थी प्रविष्ट झाले होते त्यामधील २२ विद्यार्थी विशेष प्राविण्याने तर १४ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले. यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थापक डॉ शांताराम दाजीबा पाटील, प्राचार्या वर्षा पाटील, उपाध्यक्ष संकेत पाटील व संस्थेतील सर्व मुख्याध्यापक, शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.

## ढोली गावाजवळ वाळूचे ट्रॅक्टर उलटून सहा जण जखमी

**पारोळा । श. प्र.**

येथील बोळे ढोली वेलाने रस्त्यावर वाळूचे ट्रॅक्टर येत असताना ते ढोली गावाजवळ उलटल्याने त्यात ६ जन गंभीर जखमी झाल्याची घटना घडली. याबाबत अजय प्रकाश सोनवणे, हिरालाल सुका मोरे, भूषण काळू मोरे, खुशाल राजेंद्र मोरे, गणेश विजय वाघ सर्व राहणार वेल्हाणे तालुका पारोळा यासह एक जण गंभीर जखमी झाला असून त्यांना पारोळा कुटीर रुग्णालय येथे दाखल करण्यात आले त्यांच्यावर डॉक्टर सुनील पारोचे, डॉक्टर राजेश वालडे, यांनी प्रथम उपचार करून एका गंभीर जखमीला धुळे येथे हलवण्यात आले आहे.

थोडक्यात...



## जयसिंग वाघ यांना खान्देशीयन ऑफ द इयर पुरस्कार प्रदान

**जळगाव ।** येथील प्रसिध्द आंबेडकरी साहित्यिक तथा विचारवंत जयसिंग वाघ यांनी केलेल्या साहित्य, प्रबोधन, सामाजिक तथा विविध कार्याची दाखल आस बहुउद्देशिय विकास संस्था,प्रितम पब्लिकेशन, सप्तरंग मराठी चॅनल या सस्थांतर्फे घेण्यात येवून दि.२६ मे रोजी त्यांना खान्देशीयन ऑफ दि इयर अवार्ड २०२४ या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. जळगाव येथील एका हॉटेलात घेण्यात आलेल्या शानदार समारंभात प्रसिध्द सिने अभिनेत्री किशोरी शहाणे यांच्याहस्ते सन्मानचिन्ह, बुके देवून वाघ यांचा सत्कार करण्यात आला. या प्रसंगी आमदार राजूम ामा भोळे, अॅड. संजय राणे, डॉ. अतुल भारंबे, मोतीभाऊ मुणोत, आस संस्थेचे अध्यक्ष महेंद्र पाटील, प्रितम पब्लिकेशनचे एम. डी. कैलास सोमवंशी, आयोजक पंकज आर. कासार आदी मंचावर हजर होते.जेजुरीला जाऊ या गाण्यावर किशोरी शहाणे यांनी नृत्य सादर करून प्रेक्षकांची मने जिंकली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रियंका बोरसे तर आभार पंकज कासार यांनी मानले. या प्रसंगी वाघ यांच्या कार्याची संक्षिप्त माहिती डॉक्युमेंट्रीच्या माध्यमातून पडद्यावर दाखविण्यात आली. या प्रसंगी समाजातील विविध क्षेत्रातील नामांकित मंडळी मोठ्या संख्येने हजर होती.



## जिजामाता माध्यमिक विद्यालयाचा दहावीचा शंभर टक्के निकाल

**जळगाव ।** जळगाव - न्यू जागृती मित्र मंडळ संचलित जिजामाता माध्यमिक विद्यालयाचा एस.एस.सी.परीक्षा मार्च-२०२४चा निकाल १००%लागला असून गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार संस्थेचे अध्यक्ष डी.एल.महाले, संस्थेचे सचिव सुरेश जी.बागुल, शाळेचे मुख्याध्यापक राजेंद्र आर. खोरखेडे यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. परीक्षेत ५२ विद्यार्थी प्रविष्ट होते. सर्व विद्यार्थी उत्तीर्ण होऊन घवघवीत यश मिळाले. यात प्रथम क्रमांक तेजस्विनी विठ्ठल तिवणे-८८.४० टक्के, द्वितीय क्रमांक-रूम प्रांजल संजय -८५.६०टक्के, तृतीय नाडे शुभांगी सुरेश ८४.८० टक्के, चतुर्थ क्रमांकपाटील प्रीती भगवान -८४.८० टक्के, पाचवा क्रमांक पेटकर ओम शैलेश-८४.४० टक्के गुण मिळवून यश संपादन केले. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष डी.एल.महाले, संस्थेचे सचिव सुरेश बागुल, शाळेचे मुख्याध्यापक राजेंद्र आर.खोरखेडे, शाळेचे सर्व शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद, पालक वर्ग यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार केला. सूत्रसंचालन संगीता पाटील तर आभार प्रदर्शन आशा पाटील यांनी मानले.

## श्रवण विकास मंदिर कर्णबधिर विद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे सुयश

**जळगाव ।** महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने घेण्यात आलेल्या माध्यमिक शाळांत प्रमाणपत्र इयत्ता दहावी परीक्षेचा निकाल ऑनलाईन जाहीर करण्यात आला. विवेकानंद प्रतिष्ठान संचलित श्रवण विकास मंदिर, सावखेडा येथील कर्णबधिर विद्यालयातील दिव्यांग विद्यार्थ्यांनी दरवर्षीप्रमाणे यंदाही दहावी परीक्षेत कर्णबधिर प्रवर्गातून घवघवीत यश संपादन करून शंभर टक्के उत्तीर्णतेची शालेय परंपरा अबाधित राखली आहे. विद्यार्थ्यांना सदर यशा करिता शाळेच्या मुख्याध्यापिका ज्योती खानोरे व सर्व शिक्षक वृंद यांचे वेळोवेळी मार्गदर्शन लाभले. शाळेत प्रथम रुपेश संतोष कोळी-८८.२० टक्के, द्वितीय कुंदन विकास पाटील -८८ टक्के, तृतीय कौस्तुभ दीपक चौधरी-८५.००,चतुर्थ वेदांत सुधाकर सापधरे-८० टक्के तर पाचवा लोकेश प्रवीण पाटील-७९.८० टक्के, सहावा धनराज लक्ष्मण बिऱ्हाडे-७९ टक्के तर सातवा अश्विनी समाधान गेंड ७०.८० टक्के मिळवून यश संपादन केले. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे शालेय परिवारातर्फे विवेकानंद प्रतिष्ठान संस्थेच्या अध्यक्षाशोभा पाटील, सचिव डॉ.रत्नाकर गोरे , संस्थेच्या सहकोशाध्यक्षा हेमाताई अमळकर, शालेय समिती प्रमुख प्रदीप जंगले, संस्थेच्या संचालिका वैजयंती पाध्ये,सर्व पदाधिकारी, मुख्याध्यापिका ज्योती खानोरे, वाहन विभाग प्रमुख मिलिंद पुराणिक व सर्व शिक्षक वृंद यांनी यशस्वी सर्व दिव्यांग विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

# गणेश मंडळांनी पाच झाडे लावण्याचा निर्धार करावा

## महापालिकेच्या पर्यावरण पुरक गणेशोत्सवाच्या चर्चासत्रात उमटला सूर

**जळगाव । प्रतिनिधी**

शाडुमातीची ४ फुटाची गणेशमुर्ती बसवण्यासह सजावटीत प्लॉस्टिक थर्माकोलचा वापर टाळून मूर्तीची प्राणप्रतिष्ठा करावी. तसेच सजावटीत प्लॉस्टिक व थर्माकोलचा वापर टाळून प्रत्येक गणेश मंडळाने महापालिकेने दिलेल्या जागेत किमान पाच झाडे लावण्याचा निर्धार करावा, असा सूर उमटला.

मंगळवारी महापालिकेच्या दुसऱ्या मजल्याच्या सभागृहात जळगाव महापालिकेच्या पर्यावरण विभागातर्फे पर्यावरण पूरक गणोशोत्सव चर्चासत्र घेण्यात आले. या चर्चासत्राच्या अध्यक्षस्थानी महापालिकेच्या आयुक्त तथा प्रशासक पल्लवी भागवत होत्या. यावेळी व्यासपीठावर महसुल विभागाच्या उपायुक्त निर्मला गायकवाड, कर निर्धारणच्या उपायुक्त धनश्री शिंदे, सहआयुक्त गणेश चाटे, सहआयुक्त अश्विनी गायकवाड, सहआयुक्त अभिजीत बाविस्कर, मुख्य लेखा परिक्षक चंद्रकांत वानखेडे, प्रदुषण नियंत्रण मंडळाचे करणसिंग राजपूत, कवयित्री बहिणाबाई चौधरी विद्यापीठातील संचालक तथा पर्यावरण विभागप्रमुख प्रा. डॉ. विश्वकर्मा, लाईफ सायन्स विभागाचे प्रमुख डॉ. अरुण इंगळे, मनपाच्या पर्यावरण विभागाचे सल्लागार डॉ. गीतांजली कौशिक उपस्थित होत्या.

मोठ्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा होत नाही. त्यामुळे लहान मुर्तीच बसवणे योग्य आहे. मोठ्या मूर्तीस जाणवे, वस्त्र, अलंकार व इतर परिधान करताना मोठी कसरत करावी लागते. विसर्जनावेळीही खूप काळजी घ्यावी लागते. अडचणी येतात. सनातन धर्मानुसार मूर्ती ही लहानच हवी. मोठी मूर्तीच पाहिजे असे काही नाही.लहान मुर्तीचीच विधीवत प्राणप्रतिष्ठा करणे योग्य समजले जाते. याचा विचार गणेश मंडळांनी करावा, असे पुरोहीत उमेश जोशी यांनी सांगितले. महानगरपालिका आज पर्यावरण पुरक गणेशोत्सवाची जी संकल्पना मांडत आहे ती यापुर्वीच डॉ. अविनाश आचार्य यांनी मांडली आहे. त्यानुसार सार्वजनिक गणेशोत्सव मंडळातंर्गत येणारे सर्व गणेश मंडळे ही मिरवणुकीत गुलालाची उधळण करत नाहीत. त्याऐवजी फुलांच्या पाकळ्याची उधळण करत असल्याचेही गणेश मंडळाच्या सदस्यांनी सांगितले.



### मनपाच्या उद्यानात वृक्षारोपण करा

येत्या गणेशोत्सवात मूर्तीच्या उंचीच्या स्पर्धेतून बाहेर पडून स्थापना व विसर्जन मिरवणुकीवर खूप मोठा खर्च करण्यापेक्षा मनपाच्या उद्यानात वृक्षारोपण करावा, असे आवाहन करीत मूर्तीची उंची ४ फुटापेक्षा अधिक नको. शाडू किंवा साध्या मातीची मूर्ती बसवण्याकडे लक्ष द्यावे. जळगावला मेहरून तलाव हा एकमेव जलस्त्रोत आहे. तो प्रदूषीत होणार नाही. याकडे लक्ष द्यावे. तलावात ४ फुटाच्याच मुर्तीचे सुयोग्यरितीने विसर्जन होऊ शकते. तसेच प्लॉस्टिक किंवा थर्माकोलचा वापर पूर्णपणे टाळावा.

**- पल्लवी भागवत,**
आयुक्त तथा प्रशासक, मनपा जळगाव

### मेहरुण तलाव जतन करणे गरजेचे

गणेश मूर्ती मोठी असली किंवा लहान असली म्हणून बाप्पा मोठा किंवा छोटा आशीर्वाद देईल असे काही नाही. आपल्या सर्वांच्या मनातील श्रध्दा महत्त्वाची. मेहरून तलाव सोडला तर शहरात एकही जलस्त्रोत नाही. त्यामुळे त्याचे जतन करणे गरजेचे आहे. ठराविक खोलीपर्यंत तलावातील गाळ काढता येत असला तरी तो काढणे शक्य नाही. पावसाच्या पाण्यामुळे त्यात गाळही वाहत येतो. त्यामुळे तलावात गाळ आहे. शाडू मातीची मूर्ती बसविली तर तीचे घरातच विसर्जन करणे सोपे होते.

**- निर्मला गायकवाड,**
**उपायुक्त, मनपा जळगाव**

**पर्यावरणासाठी प्रत्येकाने पुढाकार घेण्याची गरज**

पर्यावरणाच्या रक्षणासाठी व राष्ट्रीय शुध्द हवा कार्यक्रमांतर्गत महिन्याच्या पहिल्या बुधवारी मनपाच्या आयुक्तांसह सर्व कर्मचारी नो- व्हेईकल डे पाळतो. त्यादिवशी स्वत:च्या वाहनाने न येता पायी, सायकल, ई-बाईक, रिक्षा या वाहनाने येतो. उद्देश हाच की किमान एक दिवस वायु, ध्वनी प्रदूषण होणार नाही. तसेच इंधनाचीही बचत होईल. वाढदिवसानिमित्ताने अधिकारी, कर्मचारी मनपाच्या ट्री बँकेत झाड देतात. ते मनपाच्या उद्यानात लावले जाते. विविध कारणांमुळे झाडे तोडण्यासाठी अर्ज येतात. त्यांना एका झाडाचे काय महत्त्व असते त्याचा व्हिडीओ दाखविला जातो. त्यानंतर ते अर्ज देत नाहीत. मागील वर्षी झाडे तोडण्याचे १३५ अर्ज होते. मात्र आज केवळ तीनच अर्ज आहेत. पर्यावरणासाठी प्रत्येकाने पुढाकार घेण्याची गरज आहे., असे विचार मनपा पर्यावरण विभागचे अभियंता प्रकाश पाटील यांनी मांडले.

**जलप्रदुषण टाळावे**

गणेश मूर्ती तयार करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या पीओपीत अनेक घातक रसायने असल्याने त्याचे पाण्यात विघटन होत नाही. पीओपीपेक्षा शाडू मातीच्या मूर्तीची स्थापना करणे उत्तम आहे. लहान मुर्ती असल्याने ती



विसर्जन स्थळी नेणे सोपे होते. पाण्यात ही माती विरघळत असली तरी पाणी दूषित होत नाही. त्यामुळे पाण्यातील जैवविविधेता बाधा पोहचत नाही. मूर्ती तयार करताना त्यात बी टाकावी. त्यामुळे विर्सजनानंतर त्या मातीतून रोपे उगवतील. नारळ्याच्या काथ्या, भुसा, गवत, बांबू यांचा वापर सजवटीसाठी करावा. शाडू मातीची किंवा पीओपीची मूर्ती पाण्यात विसर्जीत न करता कोरड्या विहीरीत विसर्जन करून जलप्रदुषण टाळावे, असे मतकवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र लाईफ सायन्स विभाग प्रमुख डॉ. अरूण इंगळे यांनी व्यक्त केले.

**विजेच्या बचतीसाठी एलईडीचा वापर करावा**

पर्यावरणपूरक गणेशोत्सवासाठी सर्वांनी जनजागृतीवर भर द्यावा. याबाबतच्या विविध व्हिडीओ क्लिप प्रसारीत कराव्यात. पीओपीच्या मूर्ती तयार करणाऱ्या मूर्तीकारांना उपजिवेकेसाठी दुसरा पर्यायाचाही शोध व्हावा. शाडू मातीच्या मूर्तीत रसायनयुक्त रंग न वापरता हळद, पळस, मेहंदी, काथा यांसारखे नैसर्गिक रंगाचा वापर व्हावा. साध्या गुलालाऐवजी हर्बल गुलाल वापरावा. निर्माल्याचे घरातच विघटन करावे. वीजेच्या बचतीसाठी एलईडीचा वापर करावा, असे आवाहन कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र पर्यावरण विभाग प्रमुख प्रा. डॉ. विश्वकर्मा यांनी केले.

या कार्यक्रमात पर्यावरणप्रेमींची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सहआयुक्त अश्विनी गायवाड यांनी केले. सूत्रसंचालन पर्यावरण विभागाच्या कनिष्ठ अभियंत्या रसीका पाटील यांनी केले.

## उमर कॉलनीत नागरी सुविधाअभावी नागरिकांचे हाल

**जळगाव । प्रतिनिधी**

शिवाजीनगर परिसरातील उमर कॉलनी गट क्रमांक ३४४ मध्ये कोणत्याच सुविधा पुरविण्यात येत नसल्यामुळे नागरिकांना विविध समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. त्यामुळे परिसरातील अल्पसंख्याक सेवा संघाचे पदाधिकारी व नागरीकांनी मंगळवारी सायंकाळी मनपा आयुक्त पल्लवी भागवत यांची भेट घेवून सुविधा पुरविण्याची मागणी केली.

उमर कॉलनी गट क्रमांक ३४४ मध्ये अमृत योजनेअंतर्गत नळ कनेक्शन देण्यात आलेले नाहीत, भुयारी गटारींचे काम अपुर्ण आहे. तसेच या परिसरातील रस्त्यांना मोठंमोठे खड्डे पडलेले असून त्यांची दुरुस्ती करण्यात आलेली नाही, पावसाळ्यात या रस्त्यांवर गुडग्यापर्यंत पाणी साचून नागरिकांना घराबाहेर निघणे अवघड होईल. त्यामुळे महापालिकेने तातडीने रस्त्यांचे काम सुरु करावे, त्याच प्रमाणे या परिसरातील गटारींचे सांडपाणी वाहून जात नसल्यामुळे डासांची उत्पतीन होऊन डेंग्यू मलेरिया सारख्या आजार पसरतात म्हणून मनपा आयुक्त पल्लवी भागवत यांनी याकडे लक्ष देवून सुविधा पुरवाव्यात अशी मागणी नागरिकांनी केली आहे. निवेदनावर अल्पसंख्यांक सेवा संघाचे जहाँगीर खान, आसिफ अली, फिरोज खान, इरफान शेख, इब्राहिम खान, अन्वर खान, शकिल बागवान, शेख मुसा, तन्वीर सय्यद, जावेद खान, शेख अकबर, मो.शाकीर, मो. जाकीर, अफसर हमीद, मोहमद खलिल मोहमद ताहेर, फिरोज खान शकीर खान, आसीफ खान, मोईन बागवान, मसुद बागवान, समीर काचवाल आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## समस्या सोडवा अन्यथा मनसेचे आंदोलन

**जळगाव । प्रतिनिधी**

पिंप्राळ्यातील सोनी नगर , प्रल्हादनगर भागांमध्ये नागरी सुविधांचा अभाव असुन वेळोवेळी मागणी करून देखिल यावर मनपा दुर्लक्ष करीत असल्याने दि.२७ रोजी मनसेचे पदाधिकारी व नागरीकांनी महापालीकेवर धडक देवून आयुक्त पल्लवी भागवत यांना निवेदन दिले. येत्या आठ दिवसात जनतेच्या समस्या सोडविण्यात यावा अन्यथा मनसे स्टाईलने तिव्र आंदोलनाचा इशारा मनसेचे महानगरअध्यक्ष आशिष सपकाळे यांनी दिला.आहे. यावेळी श्रीकृष्ण मेंगडे, सोनी नगरातील नरेश बागडे,हेमराज गोयर,विजय चव्हाण, दिनेश जाधव, प्रल्हाद नगरातील, दिपक सोनार, जितेंद्र पिंगळे,अपर्णा निकम,दिपीका पिंगळे,अंजली बडगुजर, संगिता सोनवणे, विशाल वाल्हे, दिनकर बडगुजर,दामोदर आडेकर,अशोक पाटील,राजेंद्र बडगूजर,राजेश राजपुत, उदय राजपुत, सोनी नगर, प्रल्हाद नगर,गणपती नगर येथील नागरिक उपस्थित होते.

## दहावी परीक्षेत नोबेल फाउंडेशनच्या विद्यार्थ्यांचे घवघवीत यश

### कृष्णा पवार अमरावती विभागात प्रथम

**जळगाव । प्रतिनिधी**



इयत्ता दहावी बोर्ड परीक्षेचा निकाल जाहीर झाला. या परीक्षेत महाराष्ट्रात विज्ञान व शिक्षण क्षेत्रात अग्रगण्य समजली जाणारी नोबेल फाउंडेशन या संस्थेच्या ऑफलाइन तसेच ऑनलाईन कोर्सेसच्या विद्यार्थ्यांनी मोठे यश संपादित केले आहे. यात कृष्णा नंदकिशोर पवार याने ९९.८० टक्के गुण प्राप्त करून अमरावती विभागात प्रथम येण्याचा बहुमान पटकाविला आहे. अद्वैत निलय अढाऊ याने ९६.८०टक्के गुण प्राप्त करून मोठे यश संपादित केलेले आहे. तसेच हर्ष आशिष राव याने ९६.२०टक्के गुण प्राप्त केलेले आहेत. तसेच श्रेयस प्रवीण चौधरी याने ९२.६० टक्के गुण प्राप्त करून जळगाव येथील प्रगती विद्यामंदिर येथे द्वितीय क्रमांक प्राप्त केला. श्रेया मनोज सरोदे हिने ९०.२० टक्के गुण प्राप्त करून मुलींमध्ये द्वितीय क्रमांक पटकाविला आहे. यासह विशाल पाटील९० टक्के, प्राची साळुंखे ८९ टक्के, कृष्णा बडगुजर ८८टक्के , भावेश पाटील ८५टक्के, जयेश विसपुते ८३ टक्के यांनी मिळवून यश संपादन केले. तसेच भाग्यश्री संग्रामसिंग पाटील ही संस्कृत विषयात ९९ गुणांसह प.न.लुंकड कन्या शाळेत प्रथम आलेली आहे. सर्व यशवंत विद्यार्थ्यांचे नोबेल फाउंडेशनचे संचालक जयदीप पाटील, जयश्री पाटील, संचालक राज्यकर निरीक्षक राहुल पाटील, राजेंद्र पाटील, आदिवासी उपायुक्त कपिल पवार, सहा.पोलीस उपनिरीक्षक लीलाधर पाटील आदींनी कौतुक केले.

## नेरीनाका परिसरात मोठ्या नाल्याची सफाई करावी

### महापालिका आयुक्तांना सूरज नारखेडे यांचे निवेदनाद्वारे साकडे

**जळगाव । प्रतिनिधी**

शहरातील नेरी नाका परिसरातील मोठ्या नाल्याची साफसफाई करावी. तसेच या परिसरात बेवारस मृतदेह दफन करण्यात येऊ नये, अशी मागणी मानवाधिकार महाराष्ट्र राज्य युवा विभाग जिल्हाध्यक्ष सूरज नारखेडे यांनी आयुक्तांना निवेदनाद्वारे केली.

शहरातील नेरी नाका स्मशान भूमीजवळील परिसरात झिपरू अण्णानगर, लक्ष्मीभाऊनगर, एस टी वर्कशॉप परिसर या भागातील रहिवासी प्रयोजनार्थ लोकवस्तीमध्ये सुमारे ५ ते ७ वर्षांपासून बेवारस मृतदेह गाडत आहे. ते सुद्धा अर्धा फूट खोल करूनच मृतदेह गाडला जातो. यामुळे परिसरात दुर्गंधी पसरत असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे तसेच अर्ध्या फुटावर मृत देह गाडल्यामुळे या परिसरात मोकाट कुत्रे त्या मृतदेहाच्या अवशेष तोंडात घेऊन पूर्ण परिसरात हिंडत असतात. यासंबंधी मनपा आरोग्य अधिकरी, सहायक आयुक्त, आरोग्य निरीक्षक



यांना निवेदन देवूनही जळगाव महापालिका प्रशासन नागरिकांच्या सुरक्षितेसाठी कोणतीही उपाययोजना करण्यास असक्षम आहे. बेवारस मृतदेह या परिसरात दफन करण्यास नागरिकांनी वेळोवेळी विरोध करून सुद्धा एकाच जागेवर अनेक बेवारस देह गाडण्यात येतात. याबाबत सुद्धा आरोग्य विभागाचे अधिकारी व पोलीस कर्मचाऱ्यांना सागूनही उपयोग होत नाही. तसेच या मोठ्या नाल्यात खूप वर्षापासून साचलेले गाळ, प्लास्टिक, मैला, मृत देहाचे अवशेष अश्या मोठ्या प्रमाणात नाल्यामधून जात असल्याने घाणीचे साम्राज्य उभे झाले आहे. ते संपूर्ण आरोग्याच्या दृष्टीने हानिकारक आहे. नाल्यातील सर्व प्रकारची घाण काढण्यात यावी आणि ते ट्रिप वाईज देण्यात यावी, अशी मागणी सूरज नारखेडे यांनी आयुक्तांना निवेदनाद्वारे केली आहे.

# बेवारस मृत व्यक्तींचे तापी नदीपात्रात अस्ती विसर्जन

**निस्वार्थपणा**

## जि.एम.फाऊंडेशन अन् कुसुमताई फाऊंडेशनचा सामाजिक उपक्रम

**जळगाव । प्रतिनिधी**

जळगाव शहरातील १२ बेवारस मृत व्यक्तींवर जि.एम.फाऊंडेशन आणि कुसुमताई फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने अंतिमसंस्कार करण्यात आले होते. मंगळवारी सकाळी या बेवारस मृत व्यक्तींचे अस्ती विसर्जन तापी नदीपात्रात करण्यात आले.

जळगाव शहरातील विविध भागात शनिवार आणि रविवारी या दोन दिवसात १२ मृत्यू झालेल्या अनोळखी लोकांचे कुसुमताई फाऊंडेशन व जी.एम.फाऊंडेशन यांच्यातर्फे रविवारी रात्री अंतिम दाह संस्कार करण्यात आले. मागील काही दिवसात जळगाव शहरातील तापमानात खूप वाढ झालेली आहे आणि अश्या परिस्थिथीत फुटपाथवर, रस्त्याचा कडेला बसलेले व्यक्ती यांचा उष्माघाताने मृत्यू ओढविण्याची शक्यता आहे. या अनोळखी व्यक्तींचा मृत्यू झाल्यानंतर यांचे कोणत्याही नातेवाईक किंव्हा इतर व्यक्ती संपर्कात नसल्यामुळे या मृत व्यक्तींना अनोळखी म्हणून पोलिसांमार्फत घोषित करुन अस्मात मृत्यूची नोंद करण्यात येते. यावेळी शहर पोलिसांनी कुसुमताई फाऊंडेशनच्या सदस्यांना कॉल करून कळवले असता सिव्हिल हॉस्पिटलमध्ये तात्काळ फाऊंडेशनचे सदस्य त्या ठिकाणी येऊन पोलिसांसोबत योग्य ती कागदोपत्राची कार्यवाही पूर्ण करून त्यांचा अंतिम संस्कार करण्यात आला. रविवारी संध्याकाळी या १२ मृत अनोळखी व्यक्तीवर जी.एम फाऊंडेशनचे सदस्य व कुसुमताई फाऊंडेशनचे सदस्यांनी या अनोळखी व्यक्तींवर अंतिम संस्कार केला आणि मंगळवारी सकाळी कुसुमताई फाऊंडेशनच्या सदस्यांनी या अनोळखी व्यक्तींच्या मृतदेहाचे अस्ती विसर्जन तापी नदीपात्रात जाऊन केले.



यावेळी उपस्थित कुसुमताई फाऊंडेशनचे विजय सुरवाडे, समाजसेवक शुभम घाटे, संचालक सागर सपकाळे, वृषभ चव्हाण, चेतन धमके, संदीप पाटील, योगेश कळसकर, उमेश भालेराव तसेच इतर पदाधिकारी उपस्थित होते. कुसुमताई फाऊंडेशनतर्फे निस्वार्थ अन्न सेवा करत असून भविष्यात नेहमी अश्याच विविध प्रकारची समाजसेवा निस्वार्थ करत राहणार असल्याचा संकल्प कुसुमताई फाऊंडेशनचा सदस्यांनी व्यक्त केला आहे.

**पवित्र कुरआन - सुराह ३, आयात ५९**

अल्लाहपाशी ईसा (अ.) चे उदाहरण आदम (अ.) सारखेच आहे की अल्लाहने त्याला मातीपासून निर्माण केले आणि आज्ञा दिली की अस्तित्वात ये आणि त्याचे अस्तित्व प्रत्यक्षात आले.

**सुराह ६, आयात २**

तोच आहे ज्याने तुम्हाला मातीपासून निर्मिले, मग तुमच्याकरिता जीवनाची एक कालमर्यादा ठरवून दिली, आणि एक दुसरी कालमर्यादा आणखी देखील आहे जी त्याच्याजवळ ठरलेली आहे. परंतु तुम्ही लोक आहात की शंका-कुशंकांत गुरफटला आहात.

**जे.के.पार्क परिवार, नंदुरबार**
**मोफत कुरआन मिळविण्यासाठी संपर्क - ९८९०५६९६५२**







# तळोद्यात पाईपलाईनच्या नियोजनशून्य कारभाराने नागरीक त्रस्त

## गल्लीबोळात चाऱ्या खोदल्याने रहदारीस अडथळा, पर्यायी रस्ता बनवून काम करण्याची मागणी

**सोमावल, ता.तळोदा । वार्ताहर -**

तळोदा शहरात पाणीपुरवठयाची पाईपलाईन टाकण्याचे काम सुरु आहे . परंतू अत्यंत नियोजनशून्य कामामुळे शहरातील नागरिकांना अक्षरशः जेरीस आणले आहे. परिणामतः नागरीक या कामाला प्रचंड कंटाळले असून या कामामध्ये सुनियोजितपणा आणण्याची मागणी होत आहे.

शासनाच्या अमृत २ या योजने अंतर्गत शुध्द पाणी पुरवठयासाठी नवीन पाईपलाईन, तापी नदीवर जॅकवेल व नवीन पाण्याची टाकी बांधण्यात येत आहे. यासाठी शासनाकडून २९ कोटी ५० लाख निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. तथापि, ठेकेदाराकडून पाईपलाईन टाकण्यासाठी शहरातील गल्लीबोळात चारी खोदण्यात येत आहे. गल्लीत खोदकाम करण्यापुर्वी पर्यायी रस्ता गरजेचा आहे. मात्र, पर्यायी मार्ग व मुख्य मार्ग दोन्ही ठिकाणी एकाच वेळी खोदकामास सुरुवात करणे, ज्याठिकाणी नळ जोडणी दिल्यावर त्या गल्लीतील मातीचा ढिग न उचलणे, अनेक दिवस नळ जोडणी केल्यावरही नळी न बुजविणे, गल्ली बोळात काम झाल्यावरही रस्ता सपाट न करणे असे एक ना अनेक बाबींमुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. यावर नागरिकांना तक्रार करण्यात येते तर मुकादम यांच्याकडून आम्ही मजूर आहोत, साहेबांना सांगा, असे सांगण्यात येते. साहेबांना विचारल्यास मजूर कामावर येत नाहीत, मी आजच कामावर आलो आहे, याबाबत मला माहिती नाही. अशी उडवाउडवीची उत्तरे दिली जातात.

पाईपलाईनचे काम करीत असतांना ठेकेदाराकडून





अजिबात सुसूत्रता व नियोजनबद्धता दिसुन येत नाही. आपल्या मनमानी पद्धतीने काम करण्यात येत असल्याने रहिवाश्यांना मात्र याचा प्रचंड त्रास होत आहे. शहरातील नागरिक पाणीपुरवठयासाठी नवीन पाईपलाईनच्या कामाने बेहाल झाले आहेत. पण पालिकेचे ढिम्म प्रशासन डोळे व कानावर हात ठेवून आहे. पालिका प्रशासन नागरिकांच्या समस्या सोडविण्याला प्राधान्य न देता या नवीन शुध्द पाण्यासाठी नवीन कनेक्शन देण्यासाठी मात्र पालिकेकडून सक्तीने पाणीपट्टी वसुल करण्यात येत आहे. म्हणजे त्रास तर त्रास वरुन वसुलीचा बडगा यामुळे नागरिकांचा जीव मेटाकुटीला आला आहे.

**अवजड वाहनेही बाजारपेठेतूनच जावू लागली**

शहराला वीज वितरण कंपनी मागील बाजूला असलेला एकच पर्यायी रस्ता आहे. या रस्त्यावरही पाईपलाईनसाठी रस्ता खणल्याने अवजड वाहनांची वाहतूक बंद झाली असल्याने ही वाहतूक मुख्य बाजारपेठेतून होत आहे. त्यामुळे नियमित वाहतूक कोंडी होत असते. वास्तविक हा पर्यायी रस्त्यावर खणून झाल्यावर त्वरीत चारी बुजवून वाहतुकीस पूर्वपदावर येण्यासाठी योग्य उपाययोजना होणे आवश्यक होते. परंतु पालिका प्रशासन व ठेकेदाराला निष्काळजीपणामुळे अवजड वाहनांसाठी हा रस्ता कुचकामी ठरत आहे.

नवीन शुद्धपाणी पुरवठ्याच्या पाईपलाईनच्या कामात नियोजन दिसत नाही. पालिका प्रशासनाने यावर लक्ष ठेवून ठेकेदाराकडून सुनियोजनाने काम करुन घेण्याची अपेक्षा आहे. असे केल्यास शहरातील नागरिकांना याचा त्रास कमी होण्यास मदत होईल

**- गौतम जैन,**
**जिल्हा उपाध्यक्ष शिवसेना (शिंदे गट),**

**पावसाळयात होणार चिखलाचे साम्राज्य**

येत्या काही दिवसातच पावसाळ्याला सुरुवात होणार आहे. शहरातील व नवीन वस्तीतील पाईपलाईनसाठी खणण्यात आलेल्या जागेवरून मातीचे ढीग उचलून रस्ता सपाट करुन समतोल केला नाही तर गल्लीबोळात व नवीन वसाहतीच्या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात चिखलाचे साम्राज्य निर्माण होईल. त्यामुळे नागरिकांना आपली मोटारसायकल चालविणे जिकीरीचेतर होईलच पण पायी चालणेही कठीण होईल. पावसाळ्यापूर्वी यावर योग्य उपाय योजावेत अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# मौलाना आझाद निवासी शाळेचा शंभर टक्के निकाल

**अक्कलकुवा । श.प्र.-**

येथील जामिया संचलित मौलाना अब्दुल कलाम आझाद रेसीडेन्सी उर्दू हायस्कूलचा दहावीचा निकाल शंभर टक्के लागला. शाळेत



एकुण ११५ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. यात विशेष प्राविण्यसह ४१ विद्यार्थी उत्तीर्ण झालेले प्रथम क्षेणीत ६१ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. द्वितीय श्रेणीत १३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. यात अन्सारी मोहम्मद अमीर निसार अहमद याने ८७.६० टक्के मिळून प्रथम क्रमांक, पिंजारी मारिया युसुफ याने ८७ टक्के मिळून द्वितीय क्रमांक, तर शेख मरियामबीमी अब्दुल समद याने ८४.२० टक्के गुण मिळून तृतीय क्रमांक मिळून यश संपादन केले आहे. शाळेने यावर्षी निकालाची उत्कृष्ट परंपरा कायम ठेवली आहे. यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे संस्थापक मौलाना गुलाम मोहम्मद वस्तानवी, पदाधिकारी गुलाम मोहम्मद वस्तानवी, प्राचार्य रफिक जाहगिरदार, उपप्राचार्य इमरान शेख व शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

# वैंदाणे विद्यालयात भावना अहिरे प्रथम

**नंदुरबार । प्रतिनिधी-**

तालुक्यातील वैंदाणे येथील नंदुरबार तालुका विधायक समितीच्या श्रीमती पुतळाबाई गजमल पाटील विद्यालयाचा इयत्ता दहावीचा निकाल ८५.७१ टक्के एवढा लागला आहे. भावना गोपाल अहिरे ही विद्यार्थीनी ८९.२० टक्के गुण मिळवून विद्यालयात पहिली आली आहे.



विद्यालयातील एकूण २१ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. त्यापैकी ११ विद्यार्थी विशेष प्राविण्य मिळवून उत्तीर्ण झाले. ५ विद्यार्थी प्रथम श्रेणीत, २ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत असे एकूण १८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. विद्यालयातील भावना गोपाल अहिरे या विद्यार्थीनीने ८९.२० टक्के गुण मिळवून विद्यालयात पहिल्या क्रमांक मिळविला. मनीष दीपक पाटील याने ८३.८० ट्क्के गुण मिळवून द्वितीय आणि जयेश समाधान पाटील याने ८२.८० ट्क्के गुण मिळवून तृतीय क्रमांक पटकावला. यशस्वी विद्यार्थ्यांचे मुख्याध्यापक जे.बी.गिरासे, डी.एन.पाटील, एस.पी. पाटील, सविता आहेर, एजाज खाटीक, मुजाहिद शेख, महेंद्र पाटील, अरूण नाईक, किरण कुवर, भरत माळी, चतूर पाटील, विश्वास पवार आणि पालकांनी अभिनंदन केले.

# आदर्श माध्यमिक विद्यालय सुंदरदेचा ९३.३३ टक्के निकाल

**नंदुरबार । प्रतिनिधी-**

तालुक्यातील सुंदरदे येथील आदर्श माध्यमिक विद्यालयाचा दहावी परीक्षेचा निकाल ९३.३३ टक्के लागला.

८४.२० टक्के गुण मिळवून कु.सुवर्णा सुशील नाईक हिने प्रथम क्रमांक मिळविला. ८३ टक्के गुण मिळवून कु.हेतल कैलास माळी द्वितीय क्रमांक पटकवला. कु.सुरेखा सुभाष राठोड या विद्यार्थिनीने ८२ टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक मिळविला. यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे चेअरमन अ‍ॅड.रमणलाल शहा, सचिव डॉ.योगेश देसाई, मुख्याध्यापिका सौ.सुषमा शाह, मनीष शाह, शाळेचे मुख्याध्यापक मिलिंद बनकर आदींनी कौतूक केले.

# वेलीमाता आश्रमशाळेचा निकाल शंभर टक्के

**मोलगी । वार्ताहर-**

वेलीमाता प्राथमिक माध्यमिक उच्च माध्यमिक आश्रमशाळा वेली शाळेचा दहावीचा निकाल १०० टक्के लागला आहे. शाळेतून एकूण ३९ विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ट झाले. त्यात विशेष प्राविण्यसह ३२, तर प्रथम श्रेणीतून ६ तसेच द्वितीय श्रेणीतून १ विद्यार्थी उत्तीर्ण झालेत. प्रथम क्रमांक कु.अर्चना रमेश वळवी हिने पटकावला असून तिला ९०.६० टक्के गुण मिळालेत. चि.रोहन सामनसिंग वळवी याने ८९.८० टक्के गुण मिळवून द्वितीय, उषा नोवज्या तडवी हिने ८९.४० टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक मिळविला. यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष डॉ.कांतीलाल टाटिया, संस्थेचे सचिव संजय टाटिया, संचालक वाण्या दौल्या वळवी, माध्यमिक मुख्याध्यापक संदीप पवार प्राथमिक मुख्याध्यापक नितीन पाटील यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व शिक्षकवृंदाचे अभिनंदन केले.

# कोळदा-खेतिया महामार्गावरील भेगांची तातडीने दुरुस्ती व्हावी

## भाजपा जिल्हा उपाध्यक्ष प्रा.मकरंद पाटील यांची मागणी, रस्ते विकास महामंडळाला निवेदन

**शहादा । ता.प्र.-**

नंदुरबार जिल्ह्यातील ७५२ जी या कोळदा-खेतिया काँक्रीट रोडवरील भेगांची तातडीने दुरुस्ती करणे आवश्यक आहे. याबाबतीत तातडीने कार्यवाही करण्यात यावी अशी मागणी भारतीय जनता पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष तथा शहादा तालुका खरेदी विक्री संघाचे चेअरमन प्रा.मकरंद पाटील यांनी केली आहे.

याबाबत प्रा.मकरंद पाटील यांनी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ नाशिकच्या कार्यकारी अभियंत्यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, नंदुरबार जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ७५२ जी या कोळदा-खेतिया काँक्रीट महामार्गावर शहादा पोलिस स्टेशन ते बायपास, लोणखेडा, गोमाई पूल, ब्राम्हणपुरी गाव, खेतिया या भागात मोठ्या प्रमाणात रस्त्यावर भेगा व खड्डे पडल्याचे निदर्शनास आले आहे. या खड्ड्यांमुळे वाहनचालकांना गंभीर धोका निर्माण झाला आहे. दुर्दैवाने अनेक अपघात झाले आहेत. ज्यापैकी काही मृत्यूमुखी पडले आहेत. सतत बांधकाम प्रयत्न सुरू असतांना या महामार्गाची झपाट्याने होणारी दुरवस्था, बांधकामाच्या टप्प्यात कारागिरीच्या गुणवत्तेबद्दल आणि संभाव्य गैरप्रकारांबद्दल चिंता निर्माण करते. या रस्त्याच्या दुरुस्तीसाठी तातडीने आवश्यक उपाययोजना कराव्यात. याव्यतिरिक्त प्रवाशांच्या सुरक्षिततेची खात्री करण्यासाठी जिथे शक्य असेल तिथे सेवा रस्ते प्रदान करणे अत्यावश्यक आहे. आत्तापर्यंत एकही सेवा रस्ता उपलब्ध करून देण्यात आलेला नाही ही बाब खेदजनक असून, तातडीने कार्यवाही न झाल्यास ही बाब सार्वजनिक बांधकाम मंत्री आणि मुख्यमंत्री यांच्या निदर्शनास आणून देणार आहोत. रस्त्याची परिस्थिती सुधारण्यासाठी निर्णायक कारवाई करण्यात यावी, अन्यथा सदोष मनुष्यवधाचा गुन्हा याचिका दाखल करण्यासह कायदेशीर मार्गाचा अवलंब केला जाईल, अस इशाराही त्यांनी दिला आहे.

# ठाणेपाडाजवळ वाहनाच्या धडकेने मोटरसायकलस्वार ठार

**नंदुरबार । दि.२८। प्रतिनिधी**

भरधाव वेगातील वाहनाने धडक दिल्याने मोटरसायकलस्वार ठार झाल्याची घटना नंदुरबार-निजामपुर रस्त्यावर ठाणेपाडा नर्सरीचे पुढे घडली.

याबाबत पोलीस सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, दि.२६ मे २०२४ रोजी ४.३० च्या सुमारास निजामपुर रोडवर ठाणेपाडा नर्सरीच्या पुढे घाटात वळण रस्त्यावर एक अज्ञात अनोळखी चारचाकी वाहनाने एम.एच. १८ ए.टी. ०३८१ या क्रमांकाच्या मोटरसायकलीला मागच्या बाजुने ठोस मारली. त्यात रमेश आत्मारात चौरे (४४, रा.बंधारपाडा ता.साक्री) हा गंभीर दुखापती झाला. त्याच्या डोक्यात मागील बाजुस नाकातून व कानातून रक्त येवु लागल्याने त्यांनी खाजगी वाहनाने औषधोपचारासाठी सिव्हील हॉस्पीटल नंदुरबार येथे दाखल केले. मात्र उपचारादरम्यान ते मयत झाले. याबाबत पंकज चौरे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार नंदुरबार तालुका पोलीस ठाण्यात अज्ञात वाहनचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोना गुलाबसिंग वसावे करीत आहेत.

# बदनामी केल्याच्या कारणावरुन राडीकलम येथे खूनाचा प्रयत्न

**नंदुरबार । दि.२८। प्रतिनिधी**

बदनामी करण्याच्या कारणावरुन एकाचा खून करण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी दोघांविरुद्ध धडगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. राडीकलम बारीपाडा ता. धडगाव येथे ही घटना घडली.

याबाबत पोलीस सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, दि.१४ मे रोजी रात्री ११ वाजेच्या सुमारास सुनील चिमनलाल पावरा याच्या काकाच्या मुलीचे गावातील मुलाशी प्रेम प्रकरण आहे अशी बदनामी का करतात असे विचारल्याचा कारणावरुन सुकलाल धनसिंग पावरा, गणेश वनकर पावरा (दोन्ही राडीकलम बारीपाडा ता.धडगाव) यांनी सुनील पावरा याच्या गुप्तांगावर लाथ मारली व हाताबुक्कयांनी पोटावर, पाठीवर मारहाण करुन शिवीगाळ करुन जिवेठार मारण्याची धमकी दिली. याबाबत धडगाव पोलीस ठाण्यात दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक राहूल पाटील करीत आहेत.

# तापमानातील वाढीमुळे केळी पिकांची वाढ खुंटली

## पिके जळू लागल्याने शेतकरी हवालदिल, वाण्याविहिर परिसरातील विदारक स्थिती

**वाण्याविहिर । वार्ताहर -**

अक्कलकुवा तालुक्यातील वाण्याविहिर हे एक व्यापारी गाव असून गावालगत मोठ्या प्रमाणावर बागायती शेती केली जाते. मात्र दिवसेंदिवस तापमानात होत असलेली कमालीची वाढ यामुळे केळी या बागायती पिकांना भरपूर पाण्याची गरज असल्याने पुरेसे पाणी देऊनही पिकांची वाढ खुंटते व पिके जळू लागली आहेत. योग्यप्रकारे उत्पन्न निघत नसल्यामुळे शेतकरी हवालदिल झाला आहे.

मे महिन्यात साधारणतः रोजचे तापमान ४० डिग्री सेल्सिअस पेक्षा जास्त आहे. परिसरात जमिनीची पोत अतिशय उत्तम व काळी कसदार गाळाची जमीन असूनदेखील वाढत्या तापमानाचा फटका या नगदी पिकांनादेखील बसू लागला आहे. लाखो रुपये खर्च करून शेतकरी उत्पन्न घेण्याचा प्रयत्न करत असतो. मात्र निसर्ग साथ देत नसल्यामुळे शेतकरी कर्जबाजारी होत चालला आहे. वाण्याविहीर येथील शेतकरी कन्हैयालाल परदेशी यांचे गावालगत असलेल्या बागायती जमिनीत साडे तीन एकर केळीचे शेत तापमानामुळे पिकाची योग्य वाढ होत नसल्या कारणामुळे चार महिन्याचे झाड चक्क नांगरटी करून नवीन पीक घेण्यासाठी शेत तयार करून घेण्यात आले असल्याची भावना व्यक्त केली.

याच शेतकऱ्याची तीन ते चार एकर केळीची बाग तेरा महिन्याची झाली असून वाढलेल्या तापमानामुळे केळी योग्यप्रकारे तयार झाली नसल्याने मातीमोल भावात विकली जात असल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे. निसर्गाच्या या दुष्टचक्रात शेतकरी दिवसेंदिवस अडकत जात असल्यामुळे शेतकऱ्याची आर्थिक स्थितीदेखील खालावत चालली आहे.

एकीकडे बी बियाणे, कीटकनाशके, खते, मजूरी, वीज बील यांचे दर दिवसेंदिवस गगनाला भिडत असल्यामुळे पिकांसाठी लागणाऱ्या खर्चात खूप वाढ झाली आहे. मात्र उत्पन्नाच्या बाबतीत अनिश्चितता निर्माण झाली आहे.

# अति उष्णतेमुळे पपई व केळी रोपांचे जगणे कठीण

**मामाचे मोहिदे । वार्ताहर-**

बदलत्या ऋतुमानानुसार चार महिने उन्हाळा असतो. परंतू दरवर्षीपेक्षा यावर्षी उन्हाळा हा तीव्र स्वरूपाचा असल्याने मानव, वनस्पती व प्राण्यांना जीवन जगणे कठीण झाले आहे. पपई व केळी या रोपांची लागवड मे महिन्यात करण्यात येते. परंतू मे हिट मुळे लावलेली रोपे जळून जात आहेत. त्यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे.

नंदुरबार जिल्ह्यात कापूस, केळी व पपई या पिकांच्या लागवडीवर अधिक भर देण्यात येतो. बोअरवेल व विहिरीचे पाणी वापरून मे महिन्यात बागायती कपाशीची लागवड केली जाते. ते बी जमिनीत असल्याने काही अंशी उन्हापासून त्याच्या बचाव होतो. परंतू पपई व केळी यांची लहान रोपांची लागवड मे महिन्यात केली जाते. मे च्या आरंभी शेतकऱ्यांनी पपई व केळी रोपांची लागवड केली आहे. उन्हापासून संरक्षण म्हणून त्यांना प्लास्टिक टोपी सुद्धा लावली आहे. पाणीटंचाईवर मात म्हणून ठिबक सिंचनाने त्या रोपांना पाणी देण्याची सोय सुद्धा केली आहे.

चालू वर्षी इतर वर्षापेक्षा उन्हाळा अधिक तीव्र स्वरूपाचा आहे. कधी नव्हे ते ४० ते ४८ अंशापर्यंत कमी अधिक प्रमाणात चालू वर्षी मेमध्ये तापमान सुरू आहे. मानव, वनस्पती व प्राणी यांना या तापमानात जीवन जगणे कठीण झाले आहे. त्याच्या परिणाम केळी व पपई यांच्या रोपांच्या लागवडीवर होत आहे. शेतकरी रोपांची लागवड करतो, परंतू जास्त तापमानामुळे ती जळत आहे. एकरी ५ ते ६



हजार रोपांची लागवड केली जाते. परंतू त्यातून दोन ते तीन हजार रुपये अधिक तापमानामुळे जळत आहेत. एक रोप १७ रुपयाला शेतकरी खरेदी करतो. त्यामुळे एकूण २५ ते ३० हजार रुपयांचे नुकसान शेतकऱ्यांना सहन करावे लागत आहे. अगोदरच निसर्गाच्या लहरीपणामुळे शेतकरी कर्जबाजारी झालेला आहे. अनेक प्रयत्नांनी रोपांसाठी भांडवल उभे करून रोपांची लागवड केलेली आहे. पुन्हा उष्णतेने जळून गेलेल्या रोपांच्या जागी नवीन रोपे खरेदी करून लावावी लागत आहे. वाढते तापमान या नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकऱ्यांना होणारी नुकसान भरपाई शासनाने द्यावी ही मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

चालू वर्षी ४० ते ४५ अंशापर्यंत पोहचलेल्या तापमानामुळे दुपारी १२ ते ३ पर्यंत अघोषित पथसंचारबंदी दिसून येत आहे. मजूरी करणारे व महत्त्वाच्या कामासाठी बाहेर फिरणाऱ्या व्यक्तीस चक्कर येणे, उष्माघात होणे यासारखे त्रास होऊन काही दगावण्याच्या घटना घटत आहे. मानवाची तशीच पशुपक्ष्यांची हकीकत आहे. पोल्ट्री फार्म मधील शेकडो कोंबड्या उष्णतेने मरत आहेत. पक्षी पाण्याच्या शोधात फिरत असताना आपला जीव टांगणीला लावत आहे. अशा तापमानापासून बचाव होण्यासाठी शासनाने जलदगतीने पावले उचलणे गरजेचे आहे. शेतकऱ्यांना होणाऱ्या नुकसानीची भरपाई देण्याची घोषणा शासनाने करण्याची गरज आहे.

# वैजाली विद्यालयाचा ९३.५४ टक्के निकाल

**वैजाली । वार्ताहर**

वैजाली ता.शहादा येथील वैभव विद्यालयाचा इयत्ता १० वी चा निकाल ९३.५४ टक्के लागला.

यात जयेश विठोबा कोळी याने ९०.२० टक्के गुण मिळवून प्रथम, उमेश्वरी जितेंद्र निकुंभ हिने ८६.८० टक्के गुण मिळवून द्वितीय, मयुरी सुनील ठाकरे हिने ८५ टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक पटकावला. यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन संस्थेचे चेअरमन माजी आ.चंद्रकांत रघुवंशी, व्हा.चेअमरन मनोज रघुवंशी, सचिव यशवंतराव पाटील, कार्यालयीन अधीक्षक पुष्पेंद्र रघुवंशी, मुख्याध्यापक दिपक माळी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी केले.

# अत्याचाराच्या निषेधार्थ आज पिंपळनेर बंदची हाक

## मार्केट कमिटीतील अवैध व्यवसायांवर कारवाईसह अतिक्रमण हटावची मागणी

■ **पिंपळनेर । वार्ताहर**

शहरात काल नवापूर तालुक्यातील उंभर्टी येथील महिलेला ओढत नेत तिच्यावर दोन नराधमांनी बलात्कार केला. या घटनेमुळे पिंपळनेरकरांमधून संताप व्यक्त केला जात असून आज विविध संघटनांनी मार्केट कमिटीच्या आवारात एकत्र येत घटनेचा निषेध व्यक्त केला. तसेच उद्या दि. २९ रोजी पिंपळनेर बंदीची हाक देण्यात आली. याबरोबच मार्केट कमितीच्या आवारातील अवैध व्यवसायांवर कारवाई करण्यासह तेथील अतिक्रमण काढण्याची माणगी यावेळी करण्यात आली.

नवापूर तालुक्यातील उंभर्टी येथील मजूर महिला आपल्या मुलासह दि. २६ मे रोजी गावाकडे जाण्यासाठी पिंपळनेर येथे वाहनाची वाट बघत थांबलेली होती. तेव्हा रात्री अकरा वाजेच्या सुमारास पिंपळनेर येथील दोन तरुणांनी दोघांना गाठले. मुलाला ढकलून देत महिलेला पिंपळनेर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या बैल बाजारात ऑफिसच्या ओट्यावर बळजबरीने ओढून नेले. तेथे तिच्यावर आळीपाळीने पाशवी बलात्कार केला. महिलेने पिंपळनेर पोलिसात तक्रार देतातच पोलिसांना दोघा आरोपींना अटक केली. दरम्यान ही मानवतेला काळीमा फासणारी असून जनतेतून तीव्र संताप व्यक्त करण्यात येत आहे. त्या अनुषंगाने आज पिंपळनेर येथे मार्केट कमिटीच्या आवारात आदिवासी समाजाच्या विविध संघटनेच्या कार्यकर्त्यांनी एकत्र येत घटनेचा निषेध व्यक्त केला. तसेच आरोपींवर कठोर कारवाई व्हावी, अशी मागणी केली. याबाबत तहसीलदार दत्तात्रय शेजुळ व मार्केट कमिटीचे उपाध्यक्ष भानुदास गांगुर्डे यांना निवेदन दिले. या घटनास्थळावर घटना का घडली, यामागील कारणे देऊन आजच्या आज या मार्केट कमिटीत चालणारे अवैध व्यवसाय तसेच मार्केट कमिटीतील अतिक्रमण त्वरित हटवावे. मार्केट कमिटीला संरक्षण भिंत करण्यसह येथील सीसीटीव्ही कॅमेरे कार्यान्वित करावे अशी निवेदनातून करण्यात आली. तसेच या घटनेच्या निषेधार्थ उद्या दि.२९ रोजी पिंपळनेर शहर कडकडीत बंद ठेवण्याचा इशाराही देण्यात आला.



यावेळी अप्पर तहसीलदार दत्तात्रय शेजुळ, सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन कापडणीस, मार्केट कमिटीचे उपाध्यक्ष भानुदास गांगुर्डे, इंजि. अशोक सोनवणे, प्रवीण चौरे, आदिवासी संग्राम परिषदेचे कॉम्रेड डोंगर बागुल, आदिवासी बचाव समितीचे गणेश गावित, प्रेम चंद सोनवणे, संदीप भोये, रिपब्लिकन पक्षाचे अध्यक्ष संदीप देवरे, ताराचंद बहिरम, अनिल गायकवाड, धुडकू भारुड, पोपट गांगुर्डे, बकाराम बोरसे, आदिवासी महिला समितीच्या पुष्पा चौधरी, ईश्वर ठाकरे, वंजी पवार, मंसाराम भोये, अजय राऊत, सुनिल बोरसे, संजय मंगल ठाकरे, राकेश पवार, दिनेश बागुल, दिलीप माळी, देविदास पवार यांच्यासह शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी डोंगर बागुल यांनी घटनेचा तीव्र शब्दात निषेध केला. मार्केट कमिटीचे उपाध्यक्ष भानुदास गांगुर्डे यांनी आम्ही येथील अतिक्रमण धारकांना नोटीस दिली असून आज त्यांनी आपले अतिक्रमण न काढल्यास उद्या आम्ही जेसीबीच्या सहाय्याने हे अतिक्रमण काढून टाकू, असे सांगून घटनेचा देखील निषेध केला. तसेच या ठिकाणी वॉचमन ठेवण्यात येईल व कॅमेरे कार्यान्वित करण्यात येतील, असे आश्वासन दिले.

## पुतण्याने पावडीने वार करीत काकाला केले जखमी

■ **धुळे । प्रतिनिधी**

क्षुल्लक कारणावरून पावडीने डोक्यावर वार करीत काकाला जखमी केल्याप्रकरणी पुतण्यासह दोघांवर सोनगीर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

प्रेमराज गोविंदा पाटील (वय ४७ रा. धनुर ता.धुळे) असे जखमीचे नाव आहे.




ते दि. २६ मे रोजी दुपारी शेतात पाणी भरण्यासाठी गेले असता पाण्याची मोटार बंद होती. ती चालु नसल्याने त्यावेळी त्यांनी पुतण्या रविंद्र रोहिदास पाटील व त्याचा मुलगा मयुर यांना पाण्याची मोटार का बंद आहे, अशी विचारणा केली. त्याचा राग येवून दोघांनी काका प्रेमराज यांना शिवीगाळ, धक्काबुक्की करीत हाताबुक्यांनी मारहाण केली. तसेच जिवे मारण्याचीही धमकी दिली. तर पुतण्या रविंद्र पाटील याने खाली पाडून लोखंडी पावडीने डोक्यावर वार करीत प्रेमराज यांना जखमी केले. पुढील तपास एएसआय महेंद्र वानखेडे करीत आहे.

**अल्पवयीन मुलीला पळविले**– शिंदखेडा तालुक्यातील बेटावद येथील वारगाव येथे राहणाऱ्या १५ वर्षीय अल्पवयीन मुलीला अज्ञात आरोपीने पळवून नेले. दि. २५ मे रोजी सकाळी आठ वाजेच्या सुमारास ही घटना घडली. पिडीत मुलीच्या आईने दिलेल्या तक्रारीवरून अज्ञात आरोपीवर नरडाणा पोलिसात अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला. तपास पीएसआय रामनाथ दिवे हे करीत आहेत.

**तरूणाची विषप्राशनाने आत्महत्या**– जापी (ता.धुळे) येथील चेतन नाना कोळी (वय २३) या तरूणाने आत्महत्या केली आहे. तो दि. १९ मे रोजी दुपारी एक वाजेच्या सुमारास शेतात झाडाखाली काहीतरी विषारी पदार्थाचे सेवन केलेल्या अवस्थेत मिळून आला. त्याला जिल्हा रूग्णालयात दाखल करण्यात आले. उपचारादरम्यान त्याचा दि. २६ रोजी रात्री मृत्यू झाला. धुळे तालुका पोलिसात झाली आहे.

**रेल्वे अपघातात अनोळखी तरूण ठार**– शिंदखेडा तालुक्यातील चिरणे गावातील रेल्वे फाटक जवळ रेल्वे अपघातात अनोळखी तरूण ठार झाला आहे. काल दि. २८ रोजी सात वाजेच्या सुमारास या तरूणाचा मृतदेह आढळून आला होता. त्याचे वय अंदाजे ३५ ते ४० वर्ष असून त्याला शिंदखेडा ग्रामीण रूग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी तपासुन मृत घोषित केले. याबाबत शिंदखेडा पोलिसात नोंद झाली.

**मजुराला मारहाण**– देवपूरातील एकता नगरातील सोमनाथ गोकुळ कासोदे (वय ३१) या मजुरास परिसरातील ईश्वर महाजन, जयेश महाजन व किरण सोनवणे यांनी बेसबॉलच्या दांडक्याने व हाताबुक्यांनी मारहाण केली. तिघांवर देवपूर पोलिसात गुन्हा दाखल झाला आहे.

## नगाव, काळखेड्यातून सौर जलपरी, इले. मोटार लंपास

■ **धुळे । प्रतिनिधी**

धुळे तालुक्यातील काळखेडा येथील जितेंद्र नथ्थु पाटील यांच्या गाव शिवारातील शेतातून चोरट्यांनी ५ हजारांची सौर उर्जेवर चालणारी जलपरी व ७ हजारांची इले. मोटार लंपास केली. ही चोरीची घटना दि. २६ ते २७ मे दरम्यान रात्रीतून घडली. अज्ञात चोरट्यावर तालुका पोलिसात गुन्हा नोंद झाला असून पुढील तपास पोहेकाँ पाटील करीत आहेत. तसेच नगाव (ता. धुळे) शिवारातील गट नं. ३७०/३/२ मधून चोरट्याने तीन एचपीची मोटार लंपास केली. दि. २६ मे रोजी सायंकाळी सहा वाजेच्या सुमारास ही चोरी झाली. याबाबत पियूष शामकांत पाटील (वय ३३ रा. २३, गरूड कॉलनी, देवपूर) यांनी पश्चिम देवपूर पोलिसात दिलेल्या तक्रारीवरून अज्ञात चोरट्यावर गुन्हा दाखल झाला आहे. या चोरीचा तपास पोहेकाँ मनोहर पिंपळे हे करीत आहेत.

## प्रत्येक विभागाने नैसर्गिक आपत्ती नियोजनाचा कृती आराखडा तयार करावा

### जिल्हाधिकारी अभिनव गोयल, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची बैठक



■ **धुळे । प्रतिनिधी**

येत्या पावसाळ्यात संभाव्य नैसर्गिक आपत्तीच्या दुर्घटना टाळण्यासाठी प्रत्येक विभागाने आपत्ती व्यवस्थापन कृती आराखडा तयार करावा, असे निर्देश जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकारणाचे अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन सभागृहात काल मान्सून पूर्वतयारी आढावा बैठक झाली. यावेळी श्री. गोयल बोलत होते. बैठकीस जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल नरवाडे, उपजिल्हाधिकारी नितीन गावंडे, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी जितेंद्र सोनवणे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्री. गोयल म्हणाले, येत्या पावसाळ्यातील आपत्तीच्या दुर्घटना टाळण्यासाठी प्रत्येक विभागाने आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार करावा. तसेच प्रत्येक शासकीय विभागाने समन्वयातून कामे करावीत. नदी, नाले काठावरील अनधिकृत बांधकामे संबंधित यंत्रणांनी तातडीने हटवावीत. तालुका, ग्रामपातळीवरील आराखडे अद्ययावत करून त्याचा अहवाल सादर करावा. स्थानिक स्वराज्य संस्थांनी मान्सून कालावधीत अग्निशमन यंत्रणा तत्पर ठेवावी. जुन्या, पडक्या इमारतींची पाहणी करून योग्य ती कार्यवाही करावी. शासकीय इमारतींचे फायर ऑडिट करून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करावा.

मान्सूनपुर्व रस्ता दुरुस्ती, गटार व नालेसफाई, विद्युत दुरुस्तीची कामे वेळेत करावी. कार्यालयप्रमुखांनी पूर्व परवानगीशिवाय मुख्यालय सोडू नये. सर्व संबंधित विभागांनी नियंत्रण कक्ष स्थापन करावे आणि त्याची माहिती जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करावी. आपत्तीच्या वेळी आवश्यक असणारे साहित्य तपासून घ्यावे. धोकादायक ठिकाणांची निश्चिती करून त्याठिकाणी सूचना फलक लावण्यात यावेत. धरणनिहाय संपर्क अधिकारी नियुक्त करण्यात यावे. कृषी विभागाने हवामान खात्याकडून येणारा इशारा तात्काळ शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवावा. पूर परिस्थिती निर्माण झाल्यास शोध व बचाव कार्यासाठी राज्य आपत्ती प्रतिसाद दल, राज्य राखीव पोलिस दल, पोलिस, गृहरक्षक दलाचे जवान उपलब्ध करून द्यावेत. संबंधित यंत्रणांनी मंडळ व धरणांवरील पर्जन्यमापक यंत्रे अद्ययावत असल्याची खात्री करून घ्यावी. जलसंपदा विभागाने धरणातून पाणी सोडावयाच्या पाण्याचे नियोजन करावे. पाणी सोडण्यापूर्वी नदी काठावरील गावांना सतर्क करावे. धरणातील जलसाठ्याची अद्ययावत माहिती दररोज सादर करावी. सार्वजनिक बांधकाम विभागाने झाडे पडून बंद पडलेले रस्ते तातडीने सुरू करण्यासाठी गस्ती पथके तैनात करावीत. माती, मुरुमाचे ढिगारे काढण्यासाठी साधनसामग्रीची उपलब्धता करून द्यावी. पावसाळ्यात साथीचे आजार पसरण्याची शक्यता अधिक असते. त्यामुळे आरोग्य यंत्रणांनी सतर्क राहावे. औषधांचा पुरेसा साठा उपलब्ध करून घ्यावा. शुध्द पाण्याचा पुरवठा होईल, असे नियोजन करावे. सर्पदंश प्रतिबंधक लसीचा पुरेसा साठा उपलब्ध करून ठेवावा. जिल्हा पुरवठा विभागाने दुर्गम भागात अन्नधान्य वितरणाचे नियोजन करावे. आपत्ती काळात वीज पुरवठा खंडित झाल्यास वीज वितरण कंपनीने तो पूर्ववत करण्यासाठी विशेष पथके गठित करावीत. नियंत्रण कक्ष, धरण, पाणीपुरवठा योजना, शासकीय कार्यालयांचा वीज पुरवठा सुरळीत आणि अखंड सुरू राहील याची खबरदारी घ्यावी. महापालिका, नगरपालिका, नगरपंचायत विभागाने शहरातील अनाधिकृत होर्डींग्जवर कारवाई करावी.

महानगरपालिका व नगरपालिकेने शहरातील नालेसफाईबाबत आढावा घ्यावा व कर्मचाऱ्यांना आवश्यक प्रशिक्षण द्यावे. पाटबंधारे विभागाने दैनंदिन पाणीसाठा, विसर्ग, पर्जन्यमान आदि माहिती जिल्हा नियंत्रण कक्षास पाठवावी. पुरवठा विभागाने आपत्ती काळात नागरिकांसाठी पुरेसा धान्यसाठा वितरणाबाबत नियोजन करावे. महावितरणने विद्युतवाहिन्यांचे आवश्यक कामे पावसाळ्यापूर्वी पूर्ण करण्याच्या सूचनाही यावेळी त्यांनी दिल्या. निवासी उपजिल्हाधिकारी तथा आपत्ती व्यवस्थापनाचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. गावंडे यांनी आपत्ती व्यवस्थापन आराखड्याची पीपीटीद्वारे सविस्तर माहिती दिली. बैठकीस सर्व तहसीलदार, नगरपालिकेचे मुख्याधिकारी, भारत संचार निगम, पोलीस विभाग, पाटबंधारे विभाग, आरोग्य, कृषी, राज्य आपत्ती प्रतिसाद दल आदींसह विविध विभागांचे प्रमुख उपस्थित होते.

---

**भारत का राजपत्र**
**The Gazette of India**

सी.जी. एम. एच. अ.–08042024-253596
CG-MH-E-08042024-253596

**असाधारण**
EXTRAORDINARY
भाग II-खण्ड 3-उप-खण्ड (ii)
PART II-Section 3-Sub-section (ii)
**प्राधिकार से प्रकाशित**
PUBLISHED BY AUTHORITY

**सं.** 1554 — **नई दिल्ली शनिवार, अप्रैल ६, २०२४ / चैत्र १७, १९४६**
No. 1554 — NEW DELHI, SATURDAY, APRIL 6, 2024 / CHAITRA 17, 1946

**रेल मंत्रालय**
(मध्य रेलवे)
**अधिसूचना**
मुंबई, ५ अप्रैल, २०२४

**का.आ.**1637 **(अ).**–केन्द्रीय सरकार ने रेल अधिनियम, 1989 (1989 का 24) एवं रेलवे (संशोधन) अधिनियम 2008 (2008 का 11) (जिसे इसमे इसके पश्चात उक्त अधिनियम कहा गया हैं) की धारा 20 'क' की उप–धारा (1) के अधीन जारी, भारत के राजपत्र, असाधारण, भाग 2, खण्ड 3, उप–खण्ड (ii), तारीख 22 फ़रवरी 2022 में प्रकाशित भारत सरकार के रेल मंत्रालय (रेलवे बोर्ड) की अधिसूचना संख्या का. आ. 806 (E) तारीख 22 फ़रवरी 2022 (जिसे इसमे इसके पश्चात उक्त अधिसूचना कहा गया है), द्वारा उक्त अधिसूचना से उपाबद्ध अनुसूची में विनिर्दिष्ट भूमि को महाराष्ट्र राज्य के धुले जिले में विशेष रेल परियोजना अर्थात बोरवहिर (धुले)– नरडाणा नई रेल्वे लाईन की विशेष रेल परियोजना के निष्पादन, अनुरक्षण, प्रबंधन, और प्रचालन के लिए अपेक्षित है, ऐसी भूमि का अर्जन करने के आशय की घोषणा की थी ।

और, उक्त अधिसूचना का सार उक्त अधिनियम की धारा 20 क की उप धारा (4) के अधीन धुळे उपविभागिय अधिकारी दैनिक सामाचार पत्रों अर्थात दैनिक खान्देश खबर व दैनिक श्रमराज्य में तारीख 07-09-2023 को प्रकाशित किया गया था ।

और, आक्षेप प्राप्त हुए और उन पर विचार किया गया और आक्षेप का निदान किया गया है तथा सक्षम अधिकारी द्वारा तदनुसार आदेश पारित कर दिये गए हैं।

और, उक्त अधिनियम की धारा 20ड की उपधारा (1) के अनुसरण में सक्षम प्राधिकारी ने अपनी रिपोर्ट केंद्रीय सरकार को प्रस्तुत कर दी है।

अतः अब केंद्रीय सरकार, सक्षम प्राधिकारी से उक्त रिपोर्ट के प्राप्त होने पर और उक्त अधिनियम की धारा 20ड की उपधारा (1) द्वारा प्रदत शक्तियों का प्रयोग करते हुए, यह घोषण करती है कि इससे उपाबद्ध अनुसूची मे विनिर्दिष्ट भूमि पूर्वोक्त प्रयोजन के लिए अर्जित की जाएगी।

और यह कि केंद्रीय सरकार उक्त अधिनियम कि धारा 20ड कि उप–धारा (2) के अनुसरण में यह घोषणा करती है। कि राजपत्र मे इस अधिसूचना के प्रकाशित होने पर इससे उपाबद्ध अनुसूची में विनिर्दिष्ट भूमि सभी विलंगमों से मुक्त होकर केंद्रीय सरकार मे आत्यांकित रूप से निहित हो जाएगी।

**अनुसूची**

महाराष्ट्र राज्य के धुले जिले के अंतर्गत 1 गाँव का विशेष रेल परियोजना बोरवहिर (धुले) – नरडाणा नई रेल्वे लाईन के लिए अर्जित की जाने वाली भूमि का संरचना या उसके रहित संक्षिप्त विवरण ।

| अ.क्र. | भूसंपादन प्रकरण क्रमांक | गाँव का नाम | तालुका | 7/12 अनुसार भूधारक का नाम | सर्वे नं/ गट नं. | 7/12 अनुसार क्षेत्र (हे.आर) | | भूधारणा पद्धती | संपादन क्षेत्र (हे.आर/चौ.मी.) | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | ला. ला. क्षेत्र | पो. ख. क्षेत्र | | ला. ला. क्षेत्र | पो. ख. क्षेत्र | कुल |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 |
| 1 | 12/2023 | दापुरा | धुळे | श्रावण भटू धनगर | 25 पै. | 1.03 | 0.00 | I | 0.21 | 0.00 | 0.21 |
| | | | | | | | | कुल क्षेत्र | 0.21 | 0.00 | 0.21 |

[फा. सं. G197/2024/GOM/Dhule-Nardana/Apr/20E]
अवनीश कुमार पाण्डेय, मुख्य प्रशासनिक अधिकारी (निर्माण)

**MINISTRY OF RAILWAYS**
(CENTRAL RAILWAY)
**NOTIFICATION**
Mumbai the 5th April, 2024

S.O. 1637(E). Whereas, by the notification of the Government of India in the Ministry of Railways (Railway Board), number, S.O 806 (E) dated the 22nd February 2022 published in Gazette of India, Extraordinary. Part II, section 3 Sub-section (ii), dated the 22nd February 2022 (hereinafter referred to as the said notification) and issued under sub-section (1) of section 20A of the Railway Act, 1989 (24 of 1989) and Railway (Amendment) Act, 2008 (11 of 2008) (hereinafter referred to as the said Act), the Central Government declares its intention to acquire the land specified in the schedule annexed to the said notification for the purpose of execution, maintenance, management and operation of Special Railway Project, namely Borvihir (Dhule) - Nardana New Line in the district of Dhule in the State of Maharashtra.

And whereas, the substance of the said notification was published in for Dhule SDO daily Marathi newspapers namely "Dainik Khandesh Khabar" & "Dainik Shram Rajya". Dated 07-09-2023 under sub section (4) of section 20A of the said Act;

And whereas, objections were received and sorted the same and have been considered by the competent Authority accordingly orders have been passed:

And whereas, in pursuance of sub-section 20E of the said Act, the competent authority has submitted its report to the Central Government;

Now therefore, upon receipt of the report of the Competent Authority and in exercise of the powers conferred by sub-section (1) of section 20E of the said Act, the Central Government hereby declares that the lands specified in the schedule annexed hereto shall be acquired for the aforesaid purpose;

And further, in pursuance of sub-section (2) of section 20E of the said Act, the Central Government hereby declares that on publication of this notification in the official Gazette, the land specified in the schedule annexed hereto shall vest absolutely in the Central government free from all encumbrances.

**SCHEDULE**

**Brief description of the land to be acquired with or without structures, falling within the Special Railway Project Dhule District in connection with Dhule (Borvihir)-Nardand New Railway BG line in the state of Maharashtra.**

Village: Dapura Tal. Dhule (S.R.No. 12/2023)

Village: Dapura Tal. Dhule (S.R.No. 12/2023)

| S.N. | Land Acquisition Case No. | Name of village | Taluka | Land Owners name according to 7/12 Extracts | Survey No./ Gutt No. | Area according to 7/12 Extracts (in Hect.) | | Land Holding Method | Acquisition Area (H.R/Sq.M) | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | La.La. | Pot. Kharaba | | La.La. | Pot. Kharaba | Total |
| | | | | | | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 |
| 1 | 12/2023 | Dapura | Dhule | Shravan Bhatu Dhangar | 25 Out of | 1.03 | 0.00 | I | 0.21 | 0.00 | 0.21 |

[F. No. G197/2024/GOM/Dhule-Nardana/Apr/20E]
Avanish Kumar Pandey, Chief Administrative Officer (Construction)

जाहिरात क्र.जिमाका/धुळे/जाहि/४/२०२४-२५





## छगन भुजबळांना आवरा, त्यांच्या वयाचा आदर करतो

# काहीही बोललेलं सहन करणार नाही!

**मुंबई । वृत्तसंस्था**

लोकसभा निवडणुकीपूर्वी भाजपने 'अब की बार ४०० पार'चा नारा दिला होता. मात्र, या घोषणेमुळे लोकसभा निवडणुकीत भाजप आणि मित्रपक्षांसमोर आव्हान निर्माण झाले. या घोषणेमुळे एकप्रकारे एनडीए आघाडीचे नुकसान झाले. एनडीए ४०० पार गेल्यामुळे आपल्या देशाचे संविधान बदलले जाणार नाही, ही गोष्ट लोकांना पटवून देताना आमच्या नाकीनऊ आले, असे वक्तव्य छगन भुजबळ यांनी केले होते. त्यांच्या या वक्तव्यामुळे भाजपच्या गोटात नाराजीचे वातावरण आहे. भाजप नेते निलेश राणे यांनी मंगळवारी याबाबत ट्विट करून छगन भुजबळ यांच्यावर टीकास्त्र सोडले. या ट्विटमध्ये निलेश राणे यांनी, छगन भुजबळांना आवरण्याची गरज असल्याचे म्हटले आहे.

### भाजपा नेते नीलेश राणेंचा इशारा



### छगन भुजबळ काय म्हणाले होते?

केंद्रात सत्तास्थापनेसाठी केवळ २७२ जागांची आवश्यकता असते. तरीही भाजपने देशभरात ४०० जागा जिंकण्याचा निर्धार व्यक्त केला. हाच धागा पकडत विरोधकांनी, भाजपला ४०० जागा जिंकून संविधान बदलायचे आहे, असा प्रचार सुरु केला. भाजपने ही निवडणूक जिंकल्यास ही देशातील शेवटची निवडणूक ठरेल. भाजपाला ४०० जागा मिळाल्यास ते देशात हुकूमशाही सुरू करतील, आणीबाणी लादतील, असे वेगवेगळे आरोप आणि दावे विरोधक करू लागले. परिणामी भाजपाच्या हेतूंवर शंका उपस्थित केली जाऊ लागली. भाजपाच्या या घोषणेमुळे भाजपासह मित्रपक्षांसमोर निवडणुकीच्या प्रचारात मोठं आव्हान निर्माण झाले होते. असे छगन भुजबळ यांनी म्हटले होते.

### निलेश राणेंनी काय म्हटले?

श्री छगन भुजबळांना आवरलं पाहिजे. मी भारतीय जनता पक्षाचा एक लहान कार्यकर्ता असलो तरी आम्ही नेहमी भुजबळांचे का ऐकून घ्यावे??? मनोज जरांगे पाटील यांचे आंदोलन सुरू असताना सुद्धा आम्ही त्यांची बाजू घेतली नाही. नेहमी नेहमी भुजबळ हे बीजेपीला डिवचत असतात ही त्यांची भूमिका बरोबर नाही. आम्हाला असेच पाहिजे आम्हाला तसेच पाहिजे, युती आघाड्या करून ही भाषा एका नेत्याला शोभत नाही. आम्ही तुमच्या वयाचा आदर करतो पण उठसूट कोण युती बिघडवायची भाषा बोलत असेल तर सहन होत नाही आणि होणार नाही कारण भारतीय जनता पक्षाने सर्वात मोठा पक्ष असूनसुद्धा नेहमी सकारात्मक भूमिका ठेवली आहे.

## संजय राऊतांमुळे शरद पवारांनी ठाकरे गटाला आपलेसे केले, आता ही अवस्था झाली

**मुंबई । वृत्तसंस्था**

शिवसेना आणि भाजपा युती मजबूत आहे. मुख्यमंत्री कुठेही बदलले जाणार नाहीत. मुख्यमंत्री खंबीर आहेत. चोवीस तास काम करणारा हा मुख्यमंत्री आहेत. मराठा आंदोलन असो किंवा ओबीसी आंदोलन असो ते मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मोठ्या समर्थपणे सांभाळली, असे शिवसेना शिंदे गटाचे नेते आणि आमदार संजय शिरसाट यांनी स्पष्टपणे सांगितले.

मीडियाशी बोलताना पुणे पोर्शे कार अपघातावर बोलताना संजय शिरसाट म्हणाले की, पुणे हीट अँड रन प्रकरणाचा पोलीस तपास करत आहेत. जनतेचा संताप पाहून राजकारण तापले आहे. पोलिसांवर दबाव आहे. त्यामुळे विरोधक ज्या प्रकारे आरोप करत आहेत. पल्लवी सापळे यांच्यासंदर्भात आरोप असतील. तर त्याची चौकशी होणे आवश्यक आहे. पण ती व्यक्ती जर सक्षम असेल तर त्यांची चौकशी करण्यासाठी नियुक्ती केली असेल. आरोप करणे आणि तो सिद्ध होणे यात अंतर आहे, असे शिरसाट यांनी सांगितले.

मुख्यंत्री एकनाथ शिंदे अन् गजानन किर्तीकर भेटतील आणि निर्णय घेतील

### शिंदे गटाची टीका



आगामी विधानसभा निवडणुकीच्या जागावाटपावरून छगन भुजबळ यांनी केलेल्या विधानावर बोलताना संजय शिरसाट म्हणाले की, आमच्याकडे असलेल्या जागा आणि अजित पवार यांच्याकडे असलेल्या जागा वाटप सन्मानजनक होईल. तसेच गजानन किर्तीकर यांच्या वक्तव्यांनी शिवसैनिक नाराज आहे.

लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि गजानन किर्तीकर भेटतील आणि निर्णय घेतील, असे संजय शिरसाट यांनी म्हटले आहे. दरम्यान, शरद पवारांनी ठाकरे गटाला आपले केले. त्याला कारणीभूत संजय राऊत आहेत. शरद पवारांना शिवसेना संपवायची आहे. अमित शाह हेच सांगत आहेत की, शरद पवारांनी जी गुगली टाकली, त्यामुळे ठाकरे गटाची ही अवस्था झाली आहे, असे टीका शिरसाट यांनी केली.

## संजय राऊत यांच्या आरोपाने नागपूरचे भाजप नेते संतप्त

### कोणाकडून रसद घेण्याची गरज नाही-विकास ठाकरे

**नागपूर । वृत्तसंस्था**

शिवसेनेचे (ठाकरे गट) खासदार संजय राऊत यांनी गडकरींना पराभूत करण्यासाठी भाजपच्याच वरिष्ठ नेत्यांनी विरोधकांना रसद पुरवली, अशी टीका केल्याने भाजपचे स्थानिक नेते संतप्त झाले आहेत. त्यांनी अत्यंत खालच्या स्तरावर राऊत यांच्यावर टीका केली आहे.

संजय राऊत यांचा मेंदू सडका (भंगार) आहे, पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याबाबत स्वत:च्या वर्तमानपत्रात उलटसुलट लिखाण करून ते स्वत:चे महत्त्व वाढवत आहेत. गडकरी, फडणवीस यांच्या नेतृत्वात भाजप कार्यकर्त्यांनी रात्रंदिवस मेहनत करून लोकसभा निवडणूक लढवली, अशी



प्रतिक्रिया भाजप आमदार कृष्णा खोपडे यांनी व्यक्त केली.

खासदार संजय राऊत यांनी केलेल्या आरोपानंतर गडकरींविरोधात निवडणूक लढणारे काँग्रेस उमेदवार विकास ठाकरे यांनी मला कोणी रसद पुरवू शकत नाही, असे खडेबोल राऊत यांना सुनावले. त्यांच्याविरुद्ध पक्षश्रेष्ठींकडे तक्रार करणार असल्याचे व न्यायालयात जाणार असल्याचे त्यांनी सांगितले. राऊत यांनी केलेल्या आरोपांबाबत पुरावे द्यावेत, पुराव्याशिवाय काहीही बोलू नये, असे ठाकरे म्हणाले.

## इंडिया आघाडीची १ जूनला बैठक; ठाकरे मात्र अनुपस्थित राहणार?

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

देशभरात लोकसभा निवडणुकीची गेले दीड महिने धामधूम पाहायला मिळाली. त्यात देशभरात एनडीए विरुद्ध इंडिया आघाडी अशी काटे की टक्कर पाहायला मिळाली. आता लोकसभा निवडणुकीचा शेवटचा टप्पा राहिला आहे. त्यात १ जून रोजी इंडिया आघाडीच्या प्रमुख नेत्यांची महत्वपूर्ण बैठक दिल्लीत बोलावण्यात आली आहे. लोकसभा निवडणुकीच्या बैठक कशासाठी आहे? इंडिया आघाडीचा काय प्लॅन आहे? उद्धव ठाकरे शरद पवार उपस्थित राहणार का? असे अनेक प्रश्न चर्चेत आहे.

लोकसभा निवडणुकीचा निकाल ४ जूनला लागणार आहे. अशा परिस्थितीत निकालापूर्वीच इंडिया आघाडीची दिल्लीत १ जूनला बैठक अत्यंत महत्त्वाची बैठक पार पडणार आहे. निवडणुकीनंतरची परिस्थिती लक्षात घेऊन होणाऱ्या बैठकीत आपापसांत एकजूट ठेवण्याचा प्रयत्न आणि पुढील तयारीची रणनीती या बैठकीत ठरणार आहे.

१ जून रोजी दिल्लीत होणाऱ्या इंडिया आघाडीच्या बैठकीत सर्व मित्रपक्षांना सहभागी होण्याचं निमंत्रण देण्यात आले आहे. निवडणूक आणि निकालानंतरच्या परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी ही बैठक होत असल्याचे मानले जात आहे. त्यामुळे या बैठकीला देशातील घटक पक्षाचे आणि राष्ट्रीय पक्षाचे कोणते महत्वाचे नेते उपस्थित राहतात, हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

इंडिया आघाडीची बैठक अशा वेळी होत आहे जेव्हा लोकसभा निवडणुकीच्या शेवटच्या टप्प्यासाठी मतदान होत आहे. निवडणूक निकालापूर्वी विरोधी पक्षनेत्यांची ही बैठक घेतली जात आहे

## अजित पवारांच्या राष्ट्रवादीत जाणार का?

### शरद पवारांच्या 'लेडी जेम्स बाँड'चं उत्तर

**मुंबई । वृत्तसंस्था**

राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये जुलै २०२३ या महिन्यात उभी फूट पडली. अजित पवार हे राष्ट्रवादी पक्षाच्या आमदारांना घेऊन सत्तेत सहभागी झाले. त्यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेसचे ४२ आमदार आहेत. त्यामुळे हा पक्ष फुटला आहे. अजित पवारांना पक्षाचं नाव आणि पक्षचिन्ह घड्याळही मिळालं आहे. तसंच बारामतीची लोकसभा निवडणूकही नुकतीच पार पडली आहे. या सगळ्यानंतर शरद पवारांच्या लेडी जेम्स बाँड अशी ओळख असलेल्या सोनिया दुहान या अजित पवारांच्या पक्षात जाणार अशा चर्चा सुरु झाल्या. त्याबाबत त्यांना विचारलं असता त्यांनी या प्रश्नाचे उत्तर दिले आहे.



शरद पवारांच्या अत्यंत विश्वासू सहकारी आणि 'लेडी जेम्स बाँड' समजल्या जाणाऱ्या सोनिया दुहान आता शरद पवारांची साथ सोडून अजित पवारांच्या राष्ट्रवादीत प्रवेश करणार या चर्चा सोमवारी सुरु झाल्या. याचे कारण सोनिया दुहान या अजित पवारांनी बोलवलेल्या बैठकीला मागच्या दाराने पोहचल्या. धीरज शर्मा आणि सोनिया दुहान असे दोघेही अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश करणार आहेत, हे जवळपास निश्चित असल्याच्या चर्चा सोमवारी झाल्या. याच बाबत आता सोनिया दुहान यांनी स्पष्टीकरण दिलं आहे.

**काय म्हणाल्या सोनिया दुहान?**

मी शरद पवार गट सोडलेला नाही, तसंच मी दुसऱ्या पक्षात म्हणजेच अजित पवारांच्या गटात जाणार नाही. मला काल लोकांनी पाहिलं आणि त्यानंतर चर्चा सुरु झाली. मात्र अजित पवारांच्या घरी आमदार आले तेव्हा तर सुप्रिया सुळेही तिथे होत्या. पक्ष फुटण्याच्या काही तास आधी सुप्रिया सुळेही अजित पवारांच्या निवासस्थानी होत्या. त्यांनी कुठे अजित पवारांचा पक्ष सोडला. मी कुठलाही पक्ष सोडलेला नाही. तसंच मी शरद पवारांचा पक्ष सोडणार नाही.

## निवडणूक कामकाजात बडतर्फ शिक्षकांची नेमणूक?

### निलंबित शिक्षक, कर्मचाऱ्यांवर कारवाईची मागणी

**नाशिक । प्रतिनिधी**

नाशिक आणि दिंडोरी लोकसभा मतदारसंघाची निवडणूक प्रक्रिया २० मे रोजी पार पडली असून येत्या चार जून रोजी निकाल जाहीर होणार आहे. मात्र, निवडणूक कामकाजात निलंबित शिक्षकांची नेमणूक करण्यात आली असल्याची तक्रार आजाद समाज पक्षाने शिक्षण अधिकाऱ्यांकडे लेखी स्वरुपात केली आहे. महात्मा गांधी विद्यामंदिर आणि आदिवासी सेवा समिती संस्थेतील शिक्षक, सेवक, कनिष्ठ लिपिक आणि शिपाई या पदांच्या ४८ बेकायदेशीर मान्यता रद्द करण्यात आली आहे.

मात्र, असे असताना देखील निलंबित केलेल्या शिक्षकांची निवडणूक कामकाजात नेमणूक करण्यात आली असल्याचा आरोप आझाद समाज पक्षाचा वतीने करण्यात आला आहे. त्यामुळे या शिक्षक कर्मचाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली असताना देखील लोकसभा निवडणुकीत त्यांना जबाबदारी देण्यात आल्याने या बाबत आक्षेप घेत या संबंधीत रितसर लेखी तक्रार जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शिक्षण विभागाकडे आझाद समाज पक्षाने दिली.

**गुन्हे दाखल करण्याची मागणी**

लोकसभा निवडणुकीच्या कामकाजांसाठी निवडणूक आयोगाने शासकीयसह खाजगी संस्थांमधील शिक्षक कर्मचाऱ्यांना देखील निवडणूक कामकाजात सामावून घेतले होते. मात्र खाजगी संस्थांमधील ४८ बेकायदेशीर मान्यता रद्द संस्थेतील कार्यमुक्त केलेले कर्मचारी, ज्यांच्यावर गुन्हे दाखल असून त्यांच्याविरुद्ध शासनाने वेतन वसुलीचे आदेश काढले असताना देखील त्यांना निवडणूक प्रक्रियेत सामावून घेतले. त्यामुळे या कर्मचाऱ्यांना निवडणूक कामकाजात का जबाबदारी दिली? या प्रकरणाची चौकशी करावी, अशी मागणीही करण्यात आली आहे.

| विधीलिखित | सुरेशराव बोरकर,<br>ब्रह्मांड ज्योतिष कार्यालय, रावेर.<br>मो. : ९८५००१५५५८ |
|---|---|

बुधवार, दि. २९ मे २०२४

***-*-*-* दैनंदिन राशिभविष्य *-*-*-***

**मेष** – पितृ सेवा कराल तर मालामाल व्हाल.
**वृषभ** – भाग्याच्या वार्ता कानी येतील.
**मिथुन** – वाहन चालवू नका.
**कर्क** – आज संसाराकडे प्रथम लक्ष द्यावे.
**सिंह** – शारीरीक आरोग्याकडे लक्ष देवूनच कार्य करावे.
**कन्या** – विद्यार्थी वर्गास यश मिळणार आहे.
**तूळ** – कुटूंबाचा आधी विचार नंतर इतर कामे करावीत.
**वृश्चिक** – नवीन कार्यातून आर्थिक लाभ होतील.
**धनू** – उधारी उसनवारी वसुल होईल.
**मकर** – सर्व कार्य मनाप्रमाणेच होणारच आहेत.
**कुंभ** – कायद्याचे सर्व प्रश्न सुटतील.
**मीन** – वादापासून दूर रहावे.

## लोकसभेच्या निकालाआधीच भाजपमध्ये झाडाझडती सुरु

**मुंबई । वृत्तसंस्था**

लोकसभा मतदारसंघासाठी एक आणि त्यातील सहा विधानसभा मतदारसंघांसाठी सहा असे विस्तारक प्रदेश भाजपने नेमले होते. मात्र, लोकसभा निवडणूक संपताच ही योजना गुंडाळण्यात आली आहे. विधानसभा निवडणुकीच्या दृष्टीने त्यात फेररचना केली जाणार असून, निष्क्रिय विस्तारकांना घरचा रस्ता दाखविण्यात येणार आहे.

सर्व विस्तारकांची दोन दिवसांची बैठक २५ आणि २६ मे रोजी उत्तनच्या रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीमध्ये झाली. यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पक्षाचे राष्ट्रीय सहसंघटन मंत्री शिवप्रकाश, माजी सहसंघटन मंत्री व्ही. सतीश व विस्तारक योजनेचे प्रदेश पालक रघुनाथ कुलकर्णी यांनी मार्गदर्शन केले. यावेळी विस्तारकांकडून प्रत्येकी चार पानांचा फीडबॅक घेण्यात आला. पक्षसंघटनेच्या पातळीवर प्रत्यक्ष प्रचारात काय स्थिती होती, याबाबतची माहिती त्यांच्याकडून घेण्यात आली.

**संघटना पातळीवर घेणार आढावा**

विस्तारक योजनेचा पूर्ण आढावा आता पक्षसंघटनेच्या पातळीवर घेण्यात येणार आहे. विस्तारकांचे गुणांकन करण्याची जबाबदारी विभागीय संघटन मंत्र्यांवर सोपविण्यात आली होती. या गुणांकनानुसार आता चांगली कामगिरी करणाऱ्या विस्तारकांना पुन्हा संधी दिली जाईल किंवा पक्षसंघटनेत महत्त्वाची जबाबदारी दिली जाईल. निष्क्रिय राहिलेल्यांना वगळले जाणार आहे. काही विस्तारकांनी अन्य जबाबदारी मिळण्याची विनंती केली, तर त्याबाबतही विचार केला जाईल. लोकसभा निवडणूक काळात काही विस्तारकांनी अपेक्षेप्रमाणे काम केले नाही, अशा तक्रारी होत्या. त्यांना वगळले जाणार आहे, असे सुत्रांनी सांगितले.

### निष्क्रियांना दाखविणार घरचा रस्ता

#### विधानसभेसाठी फेररचना

विधानसभा निवडणुकीच्या दृष्टीने विस्तारक योजनेची फेररचना केली जाणार आहे. जूनअखेरीस ती पूर्ण होईल, सध्याच्या विस्तारकांना पुढील सूचना मिळेपर्यंत थांबण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. प्रदेश भाजपचे पदाधिकारी, आघाड्यांचे प्रमुख, जिल्हाध्यक्ष, तालुकाध्यक्षांच्या निवडणुकीतील कामगिरीचाही आढावा घेण्यात येणार असल्याची माहिती आहे.

#### त्रुटींचा अहवाल तयार करणार

प्रदेश भाजपने लोकसभा निवडणुकीच्या दृष्टीने पेजप्रमुखांच्या नियुक्त्यांपासून, बूथप्रमुख, कार्यविभाजन समिती अशी व्यापक यंत्रणा उभी केलेली होती. प्रत्यक्ष निवडणुकीत या यंत्रणेचा किती फायदा झाला, याचा आढावा वरिष्ठ पातळीवरून घेण्यात येणार आहे. प्रचारात कोणत्या त्रुटी राहिल्या, याचा विस्तृत अहवाल तयार करण्यात येणार असल्याचेही सुत्रांनी सांगितले. एवढी मोठी यंत्रणा उभी करूनही प्रत्यक्ष प्रचारात आणि मतदानाच्या दिवशी ती प्रभावीपणे काम करताना दिसली नाही, असे चित्र होते.


देशदूत

हे दैनिक मुद्रक व प्रकाशक **राजेंद्र कृष्णराव सोनवणे** यांनी श्रीरंग प्रकाशन प्रा.लि.यांच्याकरिता सकाळ मीडिया प्रा.लि., प्लॉट नं.सी-३, एम.आय.डी.सी.एरिया टेलिफोन एक्सचेंजसमोर, औरंगाबाद रोड, जळगाव-४२५००३ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून देशदूत कार्यालय, अमर चित्र मंदिर चौक, नंदुरबार-४२५४१२ येथे प्रसिध्द केले. ● **व्यवस्थापकीय संपादक : विक्रम सारडा.** ● **संपादक : हेमंत दिनेश अलोने*. फोन नं.**: नंदुरबार-२२११०१, जळगाव शहर कार्यालय-२२२८७८१, २२२४६६०, भुसावळ-२२०६८०, २२४७९५, रावेर-२५०४४४, धुळे-२३७९१४, फॅक्स-२३८९१४. **RNI.No. 69123/1998.** (* पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे.)